७० वर्षे
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या

निःपक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

गुरुवार, दि. ०७ मे २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १३१ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# विकासाबाबत नाशिक आता थांबणार नाही – मुख्यमंत्री

नाशिक (दै. संध्या)

- 'कुंभ उद्योग संगम आणि नाशिक गुंतवणूक शिखर परिषदे'चा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत समारोप
- क्षमता आणि सुविधांद्वारे औद्योगिक विकासाचा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला विश्वास



सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व असलेले नाशिक शहर यापुढील काळात विकासाचे ग्रोथ इंजिन ठरेल, विकासाच्या बाबतीत आता नाशिक थांबणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. क्षमता आणि सुविधांद्वारे येथील औद्योगिक विकासाला खऱ्या अर्थाने बळ मिळेल आणि गुंतवणुकीच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

हॉटेल ताज येथे आयोजित 'कुंभ उद्योग संगम आणि नाशिक गुंतवणूक शिखर परिषद २०२६' च्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, उद्योगमंत्री उदय सामंत, शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, खासदार शोभा बच्छाव, महापौर हिमगौरी आहेर- आडके, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, उद्योग विभागाचे विकास आयुक्त दीपेंद्र कुशवाह आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या उपस्थितीत विविध ३०० हून अधिक उद्योजकांसोबत १३ हजार १९० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून ३२ हजार इतकी रोजगारनिर्मिती होणार आहे.

नाशिक हे विकासाची मोठी संधी असलेले शहर असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, जिल्ह्यात गुंतवणूक व्हावी यासाठीचा कुंभ उद्योग संगम उपक्रम अतिशय चांगला आहे. या गुंतवणूक परिषदेच्या माध्यमातून नाशिक विकासाच्या मुख्य धारेत पुन्हा आला आहे. मागील तीन वर्षांपासून आपण जिल्हा केंद्रित गुंतवणूक परिषद घेण्यात येत आहे. त्यामध्ये आतापर्यंत एकूण ३१ हजार ९४५ कोटी रुपयांची गुंतवणूक नाशिक जिल्ह्यात झाली आहे. त्यातून ६६ हजार जणांना रोजगार उपलब्ध होणार आहेत. आतापर्यंत झालेल्या सामंजस्य करारापैकी ७७ टक्के कार्यान्वित झाले आहेत. यामध्ये, इलेक्ट्रॉनिक्स, कृषी आधारित सेवा, ऑटोमोबाईल, वस्त्रोद्योग, सेवा क्षेत्रासह इतर उद्योगातील गुंतवणुकीचा समावेश असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

नाशिक जिल्ह्यातही अनेक उद्योग समूहांनी गुंतवणूक करण्यास स्वारस्य दाखवले असून त्यासाठी त्यांना आवश्यक जमीन उपलब्ध होणे गरजेचे आहे. महिंद्रा अँड महिंद्रा सारखी कंपनी नाशिकमध्ये गुंतवणूक करत आहे, जागा उपलब्ध झाल्यास या उद्योगाची त्वरित सुरूवात करण्यात येईल. याशिवाय, रिलायन्स, लार्सन अॅण्ड ट्युब्रो यासारख्या उद्योगांनी गुंतवणूक केली आहे. अनेक उद्योगसमूह येथे उद्योग विस्तारासाठी इच्छुक असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. गेल्या दोन वर्षात ५७ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक नाशिकसाठी आली असून दावोस येथे झालेल्या परिषदेत नाशिक जिल्ह्यासाठी १२ हजार कोटींची गुंतवणूक राज्य शासनाने आणल्याचे त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, राज्यात आता उद्योगाचे नवीन मॅग्नेट तयार झाले आहेत. उत्तर महाराष्ट्रामध्ये नाशिक हे नवे मॅग्नेट तयार झाले आहे. त्यामुळे नाशिकचा विकास आता थांबणार नाही. अहिल्यानगर, जळगाव, धुळे, नंदुरबार हेही उद्योगासाठी गुंतवणुकीचे ग्रोथ इंजिन होत आहेत. याशिवाय, मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना येथे मोठे उद्योग येत आहेत. विदर्भात नवीन मॅग्नेट तयार झालेत. विकासाचा समतोल साधण्याचा प्रयत्न राज्य शासन करीत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## निविदा प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी एआयचा वापर करा – मंत्री आशिष शेलार

मुंबई (दै. संध्या)



महापालिकेची निविदा प्रक्रिया मानवी हस्तक्षेप शून्य होऊन ती अधिक पारदर्शक होईल, निविदेतील व्हेरिएशनवर लक्ष राहिल, कामाची अंमलबजावणी प्रभावी होईल, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करा, असे निर्देश मुंबई उपनगर पालकमंत्री तथा इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धीमत्ता विभाग मंत्री आशिष शेलार यांनी दिले. राज्याच्या कृत्रिम बुध्दीमत्ता धोरणाला राज्यमंत्री मंडळाने मंजुरी दिली असून त्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुध्दीमत्ता विभागाने काम करण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री अॅड. शेलार यांनी मुंबई महापालिका आणि इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुध्दीमत्ता विभागाची संयुक्त बैठक सह्याद्री अतिथीगृहावर घेतली. या बैठकीला महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, महाआयटीचे संचालक संजय काटकर, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या संचालक भुवनेश्वरी यांच्यासह महापालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी मुंबई महापालिका दैनंदिन कामकाजात एआयचा वापर कशा पद्धतीने होत आहे याबाबतचे सादरीकरण महापालिकेतर्फे करण्यात आले. नाले सफाईमध्ये पारदर्शकता यावी तसेच नागरी सेवांमध्ये पारदर्शक व गतीमानता यावी यासाठी एआयचा वापर करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नागरिकांच्या तक्रारी चॅटबॉट या एआय तंत्रज्ञानामार्फत विभाग कार्यालयात संकलित करण्यात येत असल्याचे पालिकेने सांगितले. मात्र यामध्ये एआयचा वापर करुन अधिकची सुधारणा करावी व कोणत्याही महापालिका कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची तक्रार त्याने बोलल्यानंतर तो व्हिडीओ रेकॉर्ड होऊन तो व्हिडीओ संबंधित विभागाकडे जाईल व त्यावर तातडीने कारवाई अथवा कार्यवाही होईल, अशा पध्दतीने नियोजन करण्याचे पालकमंत्री अॅड.शेलार यांनी निर्देश दिले.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

e-paper www.sandhyaepaper.com


### ढिंग-टांग




## महाबळेश्वर, वाई व खंडाळा तालुक्यातील आरोग्य सुविधा बळकटीचे निर्देश

मुंबई (दै. संध्या)



महाबळेश्वर, वाई आणि खंडाळा तालुक्यातील सार्वजनिक आरोग्य सेवांचा सविस्तर आढावा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील आरोग्य सेवा आयुक्तालय येथे घेण्यात आला. या बैठकीत मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांच्या सह सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, शहरी अभियान आयुक्त सुनील भोकरे तसेच आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, पुणे परिमंडळाचे आरोग्य उपसंचालक डॉ. भगवान पवार उपस्थित होते. या बैठकीत इंडियन 'रेड क्रॉस सोसायटी' संचलित महाबळेश्वर येथील 'बेल एअर हॉस्पिटल' च्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. या ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून ते अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज करण्याचा निर्णय घेण्यात आला. या रुग्णालयात आयसीयू (५ खाटा), डायलेसिस (३ खाटा) सुविधा देण्याच्या व अतिरिक्त पदांनाही मान्यता देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. यावेळी वाई तालुक्यातील उडतारे व बोपर्डी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. तसेच खंडाळा तालुक्यातील भादे व महाबळेश्वर तालुक्यातील कुंभरोशी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या नवीन इमारतींचे बांधकाम पूर्णत्वाकडे आले असून, उर्वरित कामांना गती देण्याचे तसेच आवश्यक पदनिर्मितीचे प्रस्ताव शासनाकडे पाठवण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आणि वेळेवर आरोग्य सेवा मिळणे ही प्राथमिक जबाबदारी आहे. महाबळेश्वर, वाई आणि खंडाळा तालुक्यातील आरोग्य सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक ते सर्व निर्णय तातडीने घ्यावेत. रिक्त पदे भरून मनुष्यबळाची कमतरता दूर करणे आणि अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देणेत यावे, असे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

# भाषा संचालनालयाची २८ जूनची परीक्षा रद्द

## मंत्री उदय सामंत यांची माहिती; राजपत्रित अधिकाऱ्यांना हिंदीची करण्यात आली होती सक्ती

मुंबई (दै. संध्या)



राज्याच्या भाषा संचालनालयाने राजपत्रित व अराजपत्रित अधिकाऱ्यांसाठी येत्या 28 जून रोजी आयोजित केलेली परीक्षा अखेर रद्द करण्यात आली आहे. ही परीक्षा हिंदी सक्तीच्या मुद्यामुळे वादात सापडली होती. मनसेने या प्रकरणी प्रखर आंदोलनाचा इशारा दिला होता. अखेर राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी ही परीक्षा रद्द करण्यात आल्याची माहिती दिली. यासंबंधीच्या माहितीनुसार, राज्याच्या भाषा संचालनालयाने येत्या 28 जून रोजी राजपत्रित व अराजपत्रित अधिकाऱ्यांसाठी हिंदी भाषेची निम्न व उच्च श्रेणी परीक्षा आयोजित केली होती. ही परीक्षा मुंबई, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथील परीक्षा केंद्रांवर होणार होती. या परीक्षेवर मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष डॉक्टर दीपक पवार यांनी नाराजी व्यक्त केली होती. मराठी राज्यात सरकारी कर्मचाऱ्यांसाठी हिंदी परीक्षा घेण्याची गरजच काय? असा सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला होता. मराठी भाषिक कर्मचाऱ्यांवर हिंदी लादली जाऊ नये. सरकारने हा निर्णय मागे घ्यावा व प्रस्तावित परीक्षा रद्द करावी, अशी मागणी त्यांनी केली होती. त्यांच्या या भूमिकेचा मनसे, ठाकरे गटानेही पुनरुच्चार केला होता. अखेर उद्योग मंत्री उदय सामंत यांनी ही परीक्षा रद्द करण्यात आल्याची घोषणा केली. भविष्यात सरकारी अधिकाऱ्यांना हिंदी परीक्षेची गरज आहे की नाही याची पडताळणी केली जाईल. तूर्त सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेली हिंदी भाषेची परीक्षा रद्द करण्यात आली आहे. या निर्णयाविषयी मी स्वतः विभागाच्या सचिवांशी चर्चा केली आहे. 1976 च्या नियमावलीनुसार, दरवर्षी ही परीक्षा घेतली जाते. आता या परीक्षेची गरज आहे का? 1976 चे नियम काय आहेत? याची पडताळणी केली जाणार आहे, असे ते म्हणाले.

सरकारच्या या भूमिकेचे दीपक पवार यांनी स्वागत केले आहे. ते एका पोस्टमध्ये म्हणाले, मराठी अभ्यास केंद्राच्या पुढाकाराला यश. काल मी सरकारच्या राजपत्रित अधिकारी आणि अराजपत्रित कर्मचाऱ्यांना हिंदीची परीक्षा देण्याच्या सक्तीविरोधात पोस्ट टाकली. माध्यमातल्या मित्रांनी त्याची सकाळपासून दखल घेतली. ही परीक्षा कायमस्वरूपी रद्द करावी अन्यथा परिपत्रकाची होळी करण्याची मराठी अभ्यास केंद्राची भूमिका आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेही याबद्दल आक्रमक भूमिका घेतली. संदीप देशपांडे यांचेही आभार. मराठी भाषा विभागाचे मंत्री उदय सामंत यांनी या परीक्षेला स्थगिती देण्याची घोषणा केली आहे. गरज पडल्यास ती परीक्षा कायमस्वरूपी रद्द करण्याची भूमिका त्यांनी मांडली.

परीक्षा कायमस्वरूपी रद्द करण्याचीच गरज आहे. ते जेव्हा घडेल तेव्हा मंत्रिमहोदयांचे शंभर टक्के अभिनंदन करता येईल. हिंदीच्या देशांतर्गत वसाहतवादाचा बीमोड करण्यासाठी कायम सावध राहण्याची गरज आहे. यापुढची लढाई हिंदी राष्ट्रभाषा प्रचार समिती नावाचे थोतांड महाराष्ट्रातून कायमचे हद्दपार करण्याची असणार आहे. प्रत्यक्ष कृतीत सहभागी व्हा. जय मराठी, जय महाराष्ट्र, असे दीपक पवार यांनी म्हटले आहे.

### मनसेने काय केली होती टीका?

मनसे नेते संदीप देशपांडे या प्रकरणी म्हणाले होते, हिंदीची परीक्षा घेणे म्हणजे दिल्लीत बसलेल्या भैय्यांना खूश करणे. अशा पद्धतीने आमच्या मराठी कर्मचाऱ्यांवर हिंदी भाषा लादली तर त्याचा तीव्र निषेध केला जाईल. सर्वप्रथम सरकारने अधिकाऱ्यांनी हिंदी भाषा का शिकावी? हे स्पष्ट करावे. या प्रकरणी जबरदस्ती केली गेली तर 28 जून रोजी परीक्षा केंद्रावर जो काही तमाशा होईल त्याला राज्य शासन जबाबदार राहील.

### ब्रेकिंग न्यूज

## ऑनलाईन तिकीट प्रणाली कार्यान्वित करा

मुंबई (दै. संध्या) : मुंबई महानगर प्रदेशातील प्रवासी जलवाहतुकीसाठी आधुनिक आणि एकात्मिक ऑनलाईन तिकीट वितरण व विक्री प्रणाली लवकरात लवकर कार्यान्वित करावी, असे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले. जलवाहतूक सेवा अधिक पारदर्शक, सुलभ आणि प्रवासी-केंद्रित करण्यासाठी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री राणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. बैठकीस महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप यांच्यासह बंदरे, परिवहन व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मंत्री नितेश राणे म्हणाले, मुंबई महानगर प्रदेशातील वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता जलवाहतुकीमध्ये डिजिटल प्रणालीचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. प्रवाशांना तिकीट खरेदीसाठी रांगेत उभे राहावे लागू नये, तिकीट प्रक्रिया अधिक वेगवान व्हावी तसेच संपूर्ण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता निर्माण व्हावी, यासाठी ऑनलाईन तिकीट प्रणाली अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याने याबाबत आवश्यक कार्यवाही जलदगतीने पूर्ण करावी. ही प्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर कर्मचारी आणि संबंधित यंत्रणांसाठी आवश्यकतेनुसार प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत, जेणेकरून सेवा अधिक परिणामकारक पद्धतीने राबविता येईल, असेही ते म्हणाले.

### विधानसभेवर निवड झाल्याने सोडली खासदारकी; नेत्यांना भेटण्याची शक्यता

# सुनेत्रा पवारांचा राज्यसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा

मुंबई (दै. संध्या)



सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांचा विजय झाला आहे. त्यामुळे त्यांना आपले राज्यसभा सदस्यत्व सोडणे क्रमप्राप्त होते. त्यानुसार, त्यांनी आज उपराष्ट्रपती तथा राज्यसभेचे पदसिद्ध सभापती सी पी राधाकृष्णन यांची भेट घेऊन आपला राजीनामा सुपूर्द केला. दरम्यान, सुनेत्रा पवार आपल्या दिल्ली दौऱ्यात भाजप पक्षश्रेष्ठींचीही भेट घेतील असा अंदाज आहे.

सुनेत्रा पवार यांची 18 जून 2024 रोजी राज्यसभेच्या सदस्यपदी बिनविरोध निवड झाली होती. तेव्हापासून त्या दिल्लीच्या राजकारणात सक्रिय झाल्या होत्या. पण अजित पवारांचे गत 28 जानेवारी रोजी निधन झाले आणि त्यांना राज्याच्या राजकारणात परतावे लागले. त्या सध्या सत्ताधारी राष्ट्रवादीच्या अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री म्हणून राज्यात सक्रिय आहेत. नियमानुसार, कोणत्याही व्यक्तीला एकाचवेळी दोन सभागृहांचे सदस्यपद भूषवता येत नाही. त्यामुळे बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीतील विजयानंतर त्या राज्यसभेचे आपले सदस्यत्व सोडतील अशी अपेक्षा होती.

त्यानुसार, आज त्यांनी दिल्ली दौऱ्यावर जाऊन उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांच्याकडे आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. या राजीनाम्यामुळे त्यांच्या पुढील राजकीय भूमिकेचा मार्ग अधिक स्पष्ट होणार आहे. आता सुनेत्रा पवार यांच्या रिक्त जागेवर कुणाची नियुक्ती होणार? याची चर्चाही राजकारणात सुरू झाली आहे. दिल्ली दौऱ्यात सुनेत्रा पवार भाजपच्या काही ज्येष्ठ नेत्यांचीही भेट घेतील, अशी चर्चा आहे. त्या पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व भाजप अध्यक्ष नितीन नबीन यांची भेट घेण्याची चिन्हे आहेत. या संभाव्य भेटींमध्ये राज्यातील राजकीय घडामोडी, महायुती सरकारमधील समन्वय, आगामी निवडणुकांची तयारी आणि धोरणात्मक मुद्द्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. तथापि, या भेटींबाबत कोणतीही अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. तरीही या चर्चांमुळे राजकीय वर्तुळात उत्सुकता वाढली आहे.

सुनेत्रा पवार यांच्या दिल्ली दौऱ्याकडे राज्यातील सर्वच पक्षांचे लक्ष लागले आहे. त्यांच्या राजीनाम्याच्या निर्णयामुळे राज्यसभेतील जागेवरही परिणाम होणार आहे. तसेच, विधानसभेत त्यांच्या सक्रिय सहभागामुळे राज्यातील सत्तासमीकरणांवरही परिणाम होऊ शकतो. या दौऱ्यानंतर त्यांच्या पुढील राजकीय हालचाली काय असतील, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

बारामती हा पवार कुटुंबाचा अभेद्य बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली होती. यापूर्वी अजित पवार यांनी याच मतदारसंघातून 1 लाख 65 हजार मताधिक्यांचा विक्रम प्रस्थापित केला होता. मात्र, सुनेत्रा पवार यांनी आजच्या निकालात हा आकडा खूप मागे टाकला आहे. ताज्या आकडेवारीनुसार, सुनेत्रा पवार यांनी तब्बल 2,18930 मतांच्या प्रचंड फरकाने विजय मिळवला आहे. पोटनिवडणुकीच्या इतिहासात इतक्या मोठ्या मताधिक्याने निवडून येणाऱ्या त्या पहिल्या महिला उमेदवार ठरल्या असाव्यात, असा अंदाज वर्तवला जात आहे. सुनेत्रा पवार यांच्या या विजयाने बारामतीच्या राजकारणात एका नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे. 2 लाखांहून अधिक मताधिक्य मिळवणे ही केवळ लाट नसून सुनेत्रा वहिनींच्या नेतृत्वावर जनतेने दिलेली मोठी मोहोर आहे. या विजयानंतर बारामतीत कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी आणि गुलालाची उधळण करत जल्लोष साजरा केला होता.

## जयगड बंदरांच्या निर्यात प्रकल्पाला गती द्या – मंत्री नितेश राणे

मुंबई (दै. संध्या)



- कोकणातील हापूस, काजू, मत्स्य निर्यातीसाठी सुविधा सक्षम करण्याचे निर्देश

कोकणातील काजू, हापूस आणि मत्स्य उत्पादनांना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी जयगड (रत्नागिरी) बंदर महत्वाचे आहे. येथून कृषी आणि मत्स्य उत्पादनांच्या निर्यातीला चालना देण्यासाठी आवश्यक उपाययोजना गतीने कराव्यात, अशा सूचना मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी दिल्या.

मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीस मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाच्या प्रादेशिक संचालक प्रीती चौधरी, जेएसडब्ल्यू पोर्टचे दिलीप शेट्टी, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप यांच्यासह बंदरे, परिवहन, महाराष्ट्र सागरी मंडळासह संबधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मत्स्यव्यवसाय मंत्री राणे म्हणाले, कोकणातील शेतकऱ्यास जागतिक बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी जयगड (रत्नागिरी) बंदर महत्त्वाचे असून या बंदरातून निर्यात प्रक्रियेला गती देण्यासाठी विविध विभागांमध्ये समन्वय राखत कामे गतीने व दर्जेदार करावीत. कृषी आणि मत्स्य उत्पादनांच्या निर्यातीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा, शीतसाखळी व्यवस्था, तपासणी प्रक्रिया, वाहतूक साखळी तसेच बंदरांमधील सुविधा अधिक सक्षम करण्याबाबत त्यांनी सूचित केले. मंत्री राणे म्हणाले, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर परिसरात मोठ्या प्रमाणात काजू उत्पादन होते, तर कोकणातील हापूस आंब्याला जागतिक स्तरावर विशेष मागणी आहे. मत्स्यव्यवसायही कोकणाच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा आहे. त्यामुळे या सर्व उत्पादनांना थेट परदेशी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी निर्यात प्रकल्पाचे काम कालबद्ध पद्धतीने पूर्ण करणे आवश्यक आहे. शेतकरी आणि मत्स्य व्यवसायिकांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य दर मिळण्यासाठी निर्यात व्यवस्था सक्षम होणे गरजेचे असल्याचे स्पष्ट करून, मंत्री राणे यांनी संबंधित यंत्रणांना आवश्यक पायाभूत सुविधा प्राधान्याने उभारण्याचे निर्देश दिले.

## संपादकीय

# हे भोंदू बुवा आणि बाबा इतके का आणि कसे बोकाळले?

राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या भोंदू अशोक खरात प्रकरणानंतर एकाच महिन्यात पोलिसांनी राज्यभरातल्या १६ भोंदू बाबांचा दरबार उधळून लावला आहे. यात बहुतेक प्रकरणात महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचे समोर आले आहे. पुरोगामी महाराष्ट्रात भोंदूंचे पेव किती फुटले आहे, हेच या आकडेवारीवरून सिद्ध होते. अंधश्रद्धेमुळे समाजातील फसवणूक रोखण्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने १८ वर्षे लढा दिला. या प्रदीर्घ संघर्षानंतर २०१३ मध्ये 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा व त्याचे समूळ उच्चाटन अधिनियम २०१३' हा कायदा अस्तित्वात आला. असा कायदा बनविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले होते. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात सरकार अयशस्वी ठरले असले, तरी अंधश्रद्धा निर्मूलन समिती आपल्या पातळीवर या कायद्याबाबत समाजाचे प्रबोधन, प्रचार, प्रसार करत आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी गुन्हे दाखल होत आहेत. नाशिक येथे भोंदू अशोक खरातचे प्रकरण उघडकीला आल्यावर एक महिन्यात राज्यात एकूण १६ गुन्हे दाखल झाले आहेत. पुरोगामी महाराष्ट्राला चिंतेत टाकणारी व विचार करायला लावणारी ही घटना आहे. या फसवणुकीत सर्व स्तरातील लोक दिसतात. त्यात ग्रामीण भागातले गरीब, असहाय स्त्री-पुरुष आहेत, तसेच सुशिक्षित, शहरी नागरिकही आहेत. ग्रामीण भागातील सधन, शिक्षित कुटुंबे, मध्यम आणि उच्च मध्यमवर्गातील लोकही या भोंदू बाबांच्या नादी लागलेले दिसतात. सर्वसाधारण बुद्धीच्या व्यक्तीलाही सहज फोलपणा ओळखता यावा, असे अचाट दावे करून गावोगावच्या भोंदूंनी या लोकांना आपल्या जाळ्यात ओढलेले दिसते. ही सर्वाधिक चिंतेची बाब आहे. यात महिलांच्या शारीरिक शोषणासह आर्थिक लुटीचे प्रमाण अधिक आहे. आपली फसवणूक झाल्याचे पुष्कळ उशिरा लक्षात येते आणि ते उमगते तेव्हा पुढे येऊन तक्रार करावी, तर सामाजिक प्रतिष्ठा आड येते. शिवाय भीती असते ती वेगळीच! खरात प्रकरणानंतर पीडित महिलांमध्ये लढण्याची हिंमत निर्माण झालेली दिसत आहे. आपल्याला न्याय मिळू शकतो, ही खात्री/अपेक्षाही वाढताना दिसते. वाईटातून चांगले जन्माला येत असेल, तर ते हे! अशा फसवणुकीकडे पाहण्याची सामाजिक नजरही मंद गतीने का असेना, पण निश्चितपणे बदलत आहे. त्यामुळे काही ठिकाणी उत्स्फूर्त, तर काही ठिकाणी अंनिसच्या प्रयत्नाने गुन्हे दाखल झाले आहेत. इतर पीडितांनीही पुढे येण्याची गरज निर्माण झाली आहे. गेल्या एक महिन्यातील दाखल गुन्ह्यामध्ये अशोक कुमार खरात (नाशिक), राजेंद्र गडगे (संगमनेर), चेतन सुनील मुळे (मूर्तिजापूर, जि. अकोला), पंकज देवराम घोलप (येडगाव, पुणे), मनोहर मामा भोसले ( कुर्डुवाडी, सोलापूर), नाना बर्डे (आळे फाटा, पुणे), ऋषिकेश वैद्य (वसई), अल्ताफ रईस खान (मालाड, मुंबई), रिधम पांचाळ (मालाड, मुंबई), गणेश शिंदे (श्रीरामपूर, अहिल्यानगर), अर्जुन चव्हाण उर्फ टनटन बाबा (नवी मुंबई), विठोबा वाल्मीक जाट (सातपूर, नाशिक), किसन तळपे मंदोशी (खेड, पुणे), महेशगिरी महेश काकडे (निफाड, नाशिक), अब्दुल राशीद शेख (खालापूर, रायगड), इरफान नियाज अहमद (कांदिवली, मुंबई) यांचा समावेश आहे. जादूटोणा विरोधी कायद्याची सरकारी पातळीवर प्रभावी अंमलबजावणी झाल्यास अंधश्रद्धेचे प्रमाण कमी होईल. परंतु, सरकार याबाबतीत उदासीन आहे. या कायद्याची शासकीय कमिटी कागदावरच राहिली आहे. प्रत्येक पोलिस ठाण्यात दक्षता अधिकारी नेमणे या कायद्यान्वये जरूरीचे आहे, पण तशी नेमणूक कुठे झालेली नाही. त्यामुळे गुन्हा नोंदवताना पोलिसांच्या मनात संभ्रम निर्माण होतो. परिणामी पीडितांना जलद व सत्वर न्याय मिळत नाही. पोलिसांचे प्रशिक्षण होणे गरजेचे आहे.

## संस्कृत सुभाषित

सुभाषित – वासनानां क्षयश्चात स्वाध्यासापनमं कुरू।।

अर्थ : मन निरंतर स्वस्वरूपीच राहून लयास जाते आणि त्यामुळेच वासनांचा क्षय होतो. म्हणून मनोविजय प्राप्त कर असे सांगितले आहे.

## गुरु वचन

### देश आणि काळाचे ज्ञान

देश आणि काळाच्या संबंधात जे आपले ज्ञान आहे. ते खूपच मर्यादित आणि थोडे आहे. आपण देशाच्या खोलवर जात नाही त्याचे मूळ समजून घेण्याचा प्रयत्न करत नाही. वेळ किंवा काळ काय आहे. त्याचे मूळ स्वरुप काय आहे. याला खरोखरच मनात उतरवल्याने देश आणि काळाचे आपले अपूर्ण ज्ञान काही अंशी पूर्ण होऊ शकते आणि आपले विचार सीमित देश आणि परिमित काळाच्या मागे जाऊ शकतात. विचार करण्याची गोष्ट ही आहे की, आपण युग, वर्ष, महिना, दिवस आदींना काळ समजतो तो काळ हा प्रकृतीपासून निर्मित आहे. आणि प्रकृतीच्या गर्भात आहे. परंतु महाप्रलयाच्या वेळी जेव्हा हे कार्यरुप संपूर्ण जगात आपल्या कार्यरुप प्रकृतीमध्ये मिळून जाते. त्यावेळी देश–काळाचे रुप काय असते. ते देशकाळ प्रकृतीचे कार्य असते. त्यामुळे या प्रश्नावर विचार केला तर असे वाटते की, अशक्त देश काळ ज्या अशक्त देश काह ज्या प्रकृतीरुप देश काळात मिळून जातात. प्रकृती रुप देश काळतर प्रकृतीचे स्वरुप आहे. आणि या प्रकृतीचे जे अधिष्ठान आहे. अर्थात ही प्रकृती आपले कार्य संपूर्ण जड दृश्यवर्ग मिळाल्यानंतरच ज्यामध्ये ही स्थिती असते. ते अधिष्ठान प्रकृतीचे कार्य असू शकत नाही. ते तर सर्वांचे पहिले कारण आहे आणि सर्वाचे पहिले कारण एकमात्र विज्ञानान्धन परमात्मा हेच आहे. त्या विज्ञानन्दन ती साम्यावस्थामध्ये राहते आणि कधी विकासाला प्राप्त होते. ज्यावेळी ती साम्यावस्थमध्ये त्यावेळी आपले कार्य समस्त जड दृश्यवर्गाला आपल्यात लीन करुन परमात्माच्या कोणत्याही एक अंशी स्थिती असते. आणि ज्यावेळी तोच परमात्माला सकारात्मकतेमुळे विषमता प्राप्त होते. त्यावेळी परमात्म्याची देखरेख संसाराचे सृजनत्व असते.

## उपदेशकथा



### ईश्वराचे अस्तित्व

ईश्वराने सृष्टीची निर्मिती केली. मानव नावाचा अदभूत प्राणीही निर्माण केला. त्याला तयार करताना मात्र देवाला खूप त्रास झाला. मानवाच्या निर्मितीनंतर हा त्रास वाढू लागला तेव्हा ईश्वराने साऱ्या देवतांना बोलाविले व विचारले, माणसाला तयार करुन मी संकटात सापडलो आहे. मला चोवीस तास हाका ऐकून घ्याव्या लागतात. सारखं वाटते की, माणूस सतत माझ्या दाराजवळ उभा राहून तक्रार करत आहे. त्यामुळे मला शांतपणे झोपही लागत नाही. मी काय करु ? कोठे लपू ? जेथे माणूस येणार नाही अशी जागा सांगा ? या प्रश्नानंतर ईश्वराला त्या साऱ्या देवतांनी अनेक जागा सुचविल्या. पण ईश्वराला वाटले काहीही करुन माणूस तेथे पोहचणारच. म्हणून त्याने त्या सर्व जागा नाकारल्या अखेर एक म्हातारा देव उठला ! त्याने ईश्वराला कानात काहीतरी सांगितले. ईश्वरालाही ते पटले. त्या वृद्ध देवाने सांगितले होते की, तू माणसाच्या आत हृदयात लपून बैस. ईश्वराने तसे केले आणि तो सुखी झाला.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:पूर्वाषाढा |
| ७ मे २०२६ | १८:४५:३१ |
| गुरुवार | योग:साध्य २५:५८:५२+ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:तैतिल १०:१४:१३ |
| वैशाख शके | करण:गर २३:२०:४१ |
| संवत्– १९४८ | सूर्य:मेष |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:धनु |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४५ |
| मास– वैशाख | मुस्लिम मास – जिल्काद |
| ऋतु– सौर ग्रीष्म | तारीख – २० |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:पंचमी १०:१४:१३ | संत चोखमेळा पुण्यतिथी |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९४१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | | | | | 4 | | |
| | | | | | 5 | | 6 | 1 |
| 5 | 4 | | 3 | | | | | 9 |
| 8 | | 1 | | 6 | 7 | 5 | 4 | |
| 7 | | | 5 | 3 | 9 | | | 2 |
| | 5 | 2 | 8 | 4 | | 6 | | 7 |
| 2 | | | | | 4 | | 7 | 5 |
| 4 | 8 | | 1 | | | | | |
| | | 5 | | | | | 8 | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९४० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 7 | 1 | 4 | 8 | 3 | 6 | 5 | 2 |
| 5 | 3 | 2 | 9 | 6 | 7 | 1 | 8 | 4 |
| 8 | 4 | 6 | 2 | 1 | 5 | 7 | 3 | 9 |
| 7 | 2 | 9 | 3 | 5 | 1 | 4 | 6 | 8 |
| 4 | 8 | 3 | 7 | 9 | 6 | 2 | 1 | 5 |
| 1 | 6 | 5 | 8 | 2 | 4 | 9 | 7 | 3 |
| 2 | 9 | 7 | 1 | 3 | 8 | 5 | 4 | 6 |
| 6 | 1 | 8 | 5 | 4 | 2 | 3 | 9 | 7 |
| 3 | 5 | 4 | 6 | 7 | 9 | 8 | 2 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८६२ – ग्रीस स्वतंत्र गणराज्य बनला.
- १८६२ – बवारियाचा ओट्टोला ग्रीसचा राजा निवडण्यात आले.
- १९३४ – पालावान, फिलीपींस येथे जगाच्या सर्वात मोठा मोती (६.४ किलो) मिळाला.
- १९५६ – ओरान, अलजेरियाचा युद्धात ३०० जण ठार झाले.
- २००६ – मेक्सिकोमध्ये बस अपघातात २० जण ठार झाले.
- २००७ – चीनमध्ये बस दरीत कोसळून १७ जण ठार झाले.

### राष्ट्रीय

- २००८ – भारताने जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या आपल्या सर्वात लांब पल्ल्याच्या अग्नी–३ या क्षेपशास्त्राची चाचणी घेतली.

### जन्म

- १८६१ – रवींद्रनाथ टागोर, कवी, कलावंत आणि चिंतक यांचा जन्म.
- १८८० – डॉ. पांडुरंग वामन काणे, कायदेपंडित आणि धर्मशास्त्राचे अभ्यासक; भारतरत्न यांचा जन्म.
- १९२३ – आत्माराम भेंडे, मराठी अभिनेता, दिग्दर्शक, लेखक यांचा जन्म.

### निधन

- ०६८५ – उमज्जादेनच्या चौथा खलिफा मरवान पहिला इब्न अल–हकम यांचे निधन.
- ०९७३ – रोमन योद्धा ओट्टो पहिला याचे निधन.
- २००२ – दुर्गाबाई भागवत, मराठी लेखिका, लोक संस्कृती तसेच लोकसाहित्याच्या संशोधक, लेखन विचार स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्याचे निधन.

प्रतिवार्षीक पालन
थोर समाजसुधारक डॉ. शिवाजीराव पटवर्धन पुण्यतिथी

## : SMS :

Mayawati came to Lallu's house with a goat.
Lallu: Bhaiswa ko kyon layi ho?
Maya: Dikhta nahin goatwa hai?
Lallu: Hum goatwa se hi to pooch ra ha hoon.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३६.२ | ३०.१ |
| अहमदनगर | ३५.३ | २८.८ |
| अकोला | ४१.४ | ३२.२ |
| अमरावती | ३९.१ | ३१ |
| बीड | ४२.२ | ३३.२ |
| भंडारा | ४४.१ | २९.८ |
| बुलढाणा | ३२ | २३.३ |
| चंद्रपूर | ४५.६ | ३३.३ |
| चेन्नई | ४२.१ | ३६.३ |
| नवी दिल्ली | ३२.९ | २५.७ |
| धुळे | ४०.५ | ३०.६ |
| गोंदिया | ४१.७ | ३०.१ |
| जळगाव | ४०.५ | ३२ |
| कोल्हापूर | ३६.४ | २४.९ |
| लातूर | ३६.२ | २८.३ |
| मुंबई | ३९.१ | ३४.२ |
| नागपूर | ४० | ३१.२ |
| नांदेड | ३९.९ | ३१ |
| नंदूरबार | ३७.४ | २८.३ |
| नाशिक | ३६.८ | २५.५ |
| पुणे | ३३.९ | २४.१ |
| पंढरपूर | ३७.६ | ३०.६ |
| सातारा | ३६ | २५.१ |
| सांगली | ३७.२ | २६.३ |
| सोलापूर | ३७.८ | ३० |
| वर्धा | ४१ | ३१.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग–हिरवा, शुभ दिशा:दक्षिण वैवाहिक जीवनातले काही चांगले प्रसंग उत्साह वाढविणारे ठरतील.

**तूळ :** शुभ रंग :पिवळा, शुभ दिशा : पूर्व अत्यंत आनंदाची बातमी कौटुंबिक उत्साह वाढवील.

**वृषभ :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पश्चिम आर्थिक व्यवहारात पुरेसे लक्ष घालणे हितकारक. महत्त्वाची वसुली दुर्लक्षित करू नका.

**वृश्चिक :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा:दक्षिण मुलांची शालेय प्रगती समाधानकारक राहील. कुटुंबात मंगलकार्ये ठरतील. कौटुंबिक कलह संपुष्टात येतील.

**मिथून :** शुभ रंग–हिरवा, शुभ दिशा:पश्चिम महत्त्वाचे कागदपत्र सांभाळा. मित्रांचे गैरसमज होऊ देऊ नका.

**धनू :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण परगावी जाण्याचे वेध यातून थोडाफार मन:स्ताप आणि खर्चही वाढणे शक्य.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: पश्चिम वेळचेवेळी केलेला पत्रव्यवहार व वेळापत्रकाबरहुकूम केलेली कामे यातून यश मिळेल.

**मकर :** शुभ रंग :हिरवा,शुभ दिशा:पूर्व मुलांच्या विवाहविषयक प्रश्नामध्ये अपेक्षित यश मिळेल. आर्थिक आवक अपेक्षित प्रमाणात राहील.


**सिंह :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व आपला कोणताही भडकपणा आपणास तापदायक ठरेल. मोठी गुंतवणूक पुढे ढकला. नेत्र विकार यांचा त्रास होणे शक्य.

**कुंभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा : पूर्व कुटुंबात व शेजारी–पाजारी सलोख्याचे संबंध राहतील. महिलांना पाककलेतील स्पर्धेमधून बक्षीस मिळू शकेल.

**कन्या :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पूर्व एखादे चांगले पुस्तक वाचनात येईल. चर्चासत्रातून नवीन विचार घोळत राहतील.

**मीन :** शुभ रंग:केसरी,शुभ दिशा: पश्चिम कामात आळस व चालढकल अनर्थकारक ठरेल. शिक्षण क्षेत्राशी संबंधितांना नवे फायदे मिळतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९४१



**आडवे शब्द**

१. अशक्य कोटितील
४. राजमहाल
८. आजूबाजूस
११. तमा
१३. कंबरेभोवतीचा धागा
१५. अंदाज
१७. सततची हालचाल
१८. धरणे, धरून ठेवणे
२०. पर्ण
२१. चिंतन
२३. सारखा
२४. गणपतीचे एक नाव
२७. कडक व चिवट
२९. --- कल्याणपूर– एक गायिका
३०. जिव्हा
३१. कवी
३४. किरकोळ
३७. तमाम, सर्व
३९. श्रीमंत, मालदार
४२. खकाणा
४३. टक, दृष्टी
४४. झकास
४५. प्रजा, लोक
४६. कमळ
४८. ओझे वाहणारा प्राणी
४९. गोधडी
५१. ऐट, ताठा
५२. सदोदित
५३. रिकामा
५५. रात्र
५६. संध्याकाळ
५८. निवासस्थान
६०. ठिकाणा
६२. देवीचा अश्विन महिन्यातील उत्सव
६४. रसाळ
६६. बाष्फ
६८. अनुयायी, सैनिक
६९. स्तोत्र
७१. दुलई
७२. लाकडी जिना
७३. चाणक्य नीतीतील पहिला उपाय
७५. उंट हाकणारा
७७. सुंदर, रमणीय
७८. सामन्यातील पराक्रमी
७९. चलनवलन
८१. निरुपयोगी गवत
८२. गळा
८३. सेशिक, सहन करणारा
८४. आपले राष्ट्रीय फूल

**उभे शब्द**

१. पुष्कळ, खूप
२. उजाड
३. माराची खूण
५. पशू
६. टपाल
७. सांभाळ
९. संपणे
१०. सती जाणे
१२. आयुष्य, पाणी
१४. एक जुना लेखणी प्रकार
१६. वेदना
१९. छोटा डबा
२०. साखरेचा रस
२१. अभिप्राय
२२. गुडघ्याखालील हाड
२३. सर्वांना सारखी (वाटणी)
२४. भव्य, अवाढव्य
२५. मुसलमान
२६. डाळीचे पीठ
२८. संभाव्य संकट
३०. विहिरीतून पाणी काढण्याचे जोड साधन
३२. आस्था, मनापासून काळजी
३३. लक्ष्मीचे एक नाव
३५. जय पराजय
३६. जिवलग
३७. चालू दिवस
३८. एक सुगंधी वनस्पती
४०. लाजणारा
४१. 'हेम' जोडल्यास सोन्याची साखळी
४३. बोहल्यावर उभी असलेली
४६. गुजराथी नृत्यप्रकार
४७. जमीनदार
५०. फुलांची प्रथमावस्था
५१. अडखळत बोलणारा
५४. अभिमान, तोरा
५५. दशानन
५७. आयुष्याची दोन टोके
५९. वायू, वात
६१. मूलभूत तीन गरजांपैकी एक भगवणारे दान
६२. पोलीस
६३. त्रासलेला
६५. चंद्र
६७. पळून गेलेला
७०. वस्ती
७४. सुटकेचा निश्वास
७५. कमळ, हंस
७६. लिहिलेले वाचणे, पठण
७७. जखमेवरील स्निग्ध औषधप्रकार
७९. त्रास, कष्ट
८०. गाडीचे पाय

**जम्बो शब्दकोडे क्र. ९४० चे उत्तर**

आडवे उत्तर : १.दिरंगाई ४.धडधड ६.हजरजबाबी १०.श्वसन ११.धेनु १२.यमल १३.बेकार १४.वारंवार १६.वदन १७.कसा १९.दमदाटी २०.दिवा २२.संगीतकार २६.नवरदेव २८.डफ २९.महाशय ३०.कळस ३१.षटकार ३३.काळ ३४.सालस ३५.हरकत ३७.कवायत ४०.वटवट ४२.वारी ४४.कमळ ४६.रवी ४७.पाल्हाळ ४८.मळमळ ५०.तपकीर ५२.तमाल ५४.मन ५५.नाव ५६.रवा ५८.हेम ६०.कल्हाई ६१.वाटप ६३.घरघर ६५.तलाव ६६.पोट ६७.सलगी ६९.रसातल ७१.डाकघर ७३.रव ७५.सबब ७७.कटकट ७८.नरमादी ७९.कसर ८०.टक्कल

उभे उत्तर : २.रंगीबेरंगी ३.ईश्वर ४.धनवान ५.धन्यवाद ६.हनुवटी ७.रयनदिवस ८.जम ९.बालक १५.रमणीय १८.साकव २१.वार २२.संतोष २३.तडका २४.काफर २५.पहारेकरी २६.नळ २७.देवालय ३०.कळवा–कळव ३२.टवटवीत ३३.काक ३६.रवाळ ३८.यम ३९.तळतळाट ४०.वर ४१.टपाल ४३.आळ ४५.परवानगी ४८.मनकवडा ४९.मनाई ५१.कीर ५३.माजघर ५७.संघर्ष ५९.मतलब ६१.वाट ६२.पसरट ६४.रसा ६६.पोरकट ६८.लवकर ७०.तसदी ७२.कपार ७४.धन ७६.बक ७७.कल

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### निष्काळजीपणाचा कळस; फलकांच्या अभावामुळे अपघात, जीव धोक्यात

पुणे (दैनिक संध्या) : पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर सुरू असलेल्या रस्ता रुंदीकरण, सर्व्हिस रोड आणि पुलांच्या कामांदरम्यान ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे वाहनचालकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचे चित्र समोर आले आहे. कामाच्या ठिकाणी आवश्यक दिशादर्शक फलक, इशारे व सुरक्षा उपाययोजना नसल्याने अपघातांचा धोका वाढला असून, नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. चौफुला ते वरवंड दरम्यान अन्नपूर्णा हॉटेल शेजारी ओढ्यावर पुलाचे काम सुरू आहे. मात्र, येथे कोणत्याही प्रकारचे दिशादर्शक फलक किंवा डायव्हर्जनची सूचना नसल्याने वाहनचालकांना पुढील रस्त्याचा अंदाज येत नाही. याच निष्काळजीपणामुळे एका वाहनचालकाची गाडी थेट सुरू असलेल्या पुलाच्या कामात जाऊन पलटी झाल्याची घटना घडली. सुदैवाने जीवितहानी टळली असली, तरी हा प्रकार प्रशासनासाठी गंभीर इशारा मानला जात आहे. दरम्यान, चौफुला ते वरवंड मार्गावर एचपी पेट्रोल पंप ते अन्नपूर्णा हॉटेल आणि पुढे केडगाव फाटापर्यंत काही ठिकाणी सर्व्हिस रोड पूर्ण झाला असला, तरी अनेक ठिकाणी रस्ता अर्धवट अवस्थेत आहे. "रस्ता पुढे बंद आहे" किंवा "डायव्हर्जन पुढे आहे" अशा सूचना नसल्याने वाहनचालक गोंधळून जातात आणि अपघाताची शक्यता वाढते. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या परिसरात यापूर्वीही किरकोळ अपघात घडले आहेत. तरीही संबंधित ठेकेदार व प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे. वेळीच उपाययोजना न केल्यास भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. नागरिकांनी कामाच्या ठिकाणी तत्काळ दिशादर्शक फलक लावणे, धोकादायक ठिकाणी रिफ्लेक्टर, बॅरिकेड्स व प्रकाशव्यवस्था करणे, तसेच अर्धवट रस्त्यांवर स्पष्ट डायव्हर्जन दर्शविण्याची मागणी केली आहे. निष्काळजीपणाबद्दल संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याचीही मागणी जोर धरत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन ठोस पावले उचलणे आवश्यक झाले आहे.

### विद्यार्थी साहाय्यक समितीतर्फे वाचन-लेखन कार्यशाळेचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : विद्यार्थी साहाय्यक समितीचा ग्रंथालय विभाग आणि आखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन-लेखन कार्यशाळेचे आयोजन केले आहे. यात १६ ते २१ वयोगटातील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे. १४, १५ मे रोजी वाचन कार्यशाळा आणि १६ ते १८ मे लेखन कार्यशाळा समितीच्या जागेत होणार आहे. समितीच्या विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य आणि बाहेरील विद्यार्थ्यांसाठी नाममात्र शुल्क आकारले जाणार आहे. कार्यशाळेत सहभागासाठी पूर्वनोंदणी आवश्यक असून ७ मे पर्यंत ९२७०४४३९२३ या व्हॉट्सॲप क्रमांकावर नोंदणी करावी, असे समितीतर्फे कळविण्यात आले आहे.

### मुलीवर अत्याचार, बेकायदेशीर गर्भपात; डॉक्टरसह भोंदूबाबा पोलिसांच्या ताब्यात

पुणे (दैनिक संध्या) : बारामती तालुक्यातील एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्यानंतर तिचा बेकायदेशीर गर्भपात करण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात गर्भपात केल्याचा आरोप असलेल्या फलटण येथील डॉ. योगेश नरुटे व कोऱ्हाळे येथील भोंदूबाबा पिंटू धुमाळ यांना वडगाव निंबाळकर पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित अल्पवयीन मुलीवर काही दिवसांपूर्वी लैंगिक अत्याचार झाल्याचे निष्पन्न झाले होते. त्यानंतर पीडितेच्या गर्भधारणेची बाब समोर आल्यानंतर तिला उपचारासाठी फलटण येथील डॉ. योगेश नरुटे यांच्या खासगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, कायद्याने आवश्यक असलेल्या वैद्यकीय व शासकीय प्रक्रिया पूर्ण न करता तसेच बाल संरक्षण नियमांचे उल्लंघन करून गर्भपात करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणात लैंगिक अत्याचारासंबंधीचा गुन्हा तसेच अल्पवयीन मुलीच्या गर्भपातासंबंधी वैद्यकीय नियमांचे उल्लंघन झाल्याने गुन्हा अधिक गंभीर बनला आहे. पोलिसांनी डॉक्टराविरोधात संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल केला असून पुढील तपास वडगाव निंबाळकर ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षण नागनाथ पाटील करत आहे. तसेच, या प्रकरणातील मुख्य आरोपी कोण आहे, अत्याचार नेमका कोणी केला आणि गर्भपातासाठी कोणत्या व्यक्तींनी मदत केली याबाबत पोलिस अधिक तपास करीत आहेत. पीडित मुलीच्या कुटुंबीयांचीही चौकशी करण्यात येत असून प्रकरणातील इतर आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. या घटनेमुळे बारामती तालुक्यात संताप व्यक्त केला जात असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### 'आम्हाला लाडकी बहीण नको; सुरक्षा योजना सुरु करा', संतप्त महिलांची सरकारकडे मागणी

पुणे (दैनिक संध्या) : आम्हाला लाडकी बहीण नको, महिलांसाठी सुरक्षा योजना सुरु करा, अशी मागणी पुण्यातील महिलांनी सरकारकडे केली आहे. पर्वती येथे आजोबाकडून ९ वर्षीय मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न झाला. त्यानंतर संतप्त जमावाने रात्री याभागात रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी गृहिणी महिलांनी मुलींच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. आम्हाला लाडकी बहीण नको. आमच्यासाठी आणि आमच्या मुलींसाठी सुरक्षा योजना सुरु करा. सद्यस्थितीत कोणत्याही लहान मुली सुरक्षित नसल्याचे त्यांनी बोलताना सांगितले आहे. आता कितीतरी प्रकरणे रोज घडत आहेत. आम्ही दिवसभर पोटापाण्यासाठी कामाला जातो. आमच्या मुली शाळेत जातात. नंतर घरी असतात. त्यामुळे आता आमच्या पोरी सुरक्षित पाहिजे अशी मागणी या पालकांनी केली आहे. पुणे शहरातील पर्वती पायथा परिसरातील जय भवानी नगर येथे अत्यंत संतापजनक व धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका अल्पवयीन मुलीवर तिच्याच आजोबांकडून गैरकृत्य करण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती समोर आली आहे.आरोपीचे नाव अंबादास यलम्मा जाधव (वय अंदाजे 62 वर्षे, रा. जय भवानी नगर) असे असून तो पीडित मुलीचा आजोबा असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या आजोबावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या विरोधात पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटना घडत असताना परिसरातील नागरिकांच्या वेळीच लक्षात आल्यामुळे त्यांनी तातडीने हस्तक्षेप करत आरोपीला पकडले आणि संतप्त जमावाने त्याला चोप दिला. या प्रकारानंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेच्या निषेधार्थ नागरिकांनी निलायम पूल ते पर्वती पायथा दरम्यान रास्ता रोको आंदोलन केले. नसरापूर येथील अलीकडील घटनेमुळे आधीच संतप्त असलेले नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. दरम्यान, पीडित मुलीला वैद्यकीय तपासणीसाठी ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पीडितेची आई पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करत असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# 'तुम्ही कामाला गेल्यावर तात्या मला ओढून ओढून घ्यायचे'

## पर्वती प्रकरणातील मुलीने आई-वडिलांना सांगितली हादरवणारी कहाणी

पुणे (दै. संध्या)



नसरापूरमधील चिमुरड्या मुलीच्या अत्याचार आणि हत्येची घटना ताजी असतानाच पुणे शहरातील पर्वती भागात असाच एक चीड आणणारा प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे. पर्वती येथील एका 70 वर्षांच्या वृद्धाने आपल्या स्वतःच्या नातीवरच अत्याचाराचा (Rape) प्रयत्न केला. या मुलीचे आई-वडील हे कामाला जातात. ते घरी नसताना या वृद्धाने घरातच नातीवर अतिप्रसंग (Sexual Assault) करण्याचा प्रयत्न केला. याविषयी बोलताना मुलीच्या पालकांनी संताप झाला पाहिजे. माझ्या मुलीच्या अंगावर हात टाकणाऱ्या माझ्या बापाला फाशी द्या, अशी संतप्त मागणी मुलीच्या आईने केली. ते बुधवारी पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

या सगळ्या घटनेविषयी बोलताना मुलीच्या आई-वडिलांनी सांगितले की, आम्ही दोघे दिवसभर कामावर जातो. मी कपड्याच्या दुकानात कामाला जाते. माझे पती रिक्षा चालवतात. मी रात्री नऊ-साडेनऊच्या सुमारास कामावरुन घरी आले तेव्हा मुलीने मला हा सगळा प्रकार सांगितला. मी घरी पोहोचले तेव्हा तिच्या अंगावर कपडे नव्हते. तसेच अंगावर नखांचे ओरखडे होते. माझ्या स्वतःच्याच बापाने माझ्या मुलीवर बलात्काराचा प्रयत्न केला. त्याला फाशी झाली पाहिजे, अशी मागणी मुलीच्या आईने केली.

या प्रकरणात पोलीस आम्हाला सहकार्य करत आहेत. मी कपड्यांच्या दुकानात काम करते. रात्री नऊ वाजता मी कामावरुन सुटल्यावर हा सारा प्रकार घडला. नंतर मुलीने आम्हाला सांगितले की, यापूर्वीही असाचा प्रकार घडला होता. पण तेव्हा ती गोष्ट आम्हाला माहिती नव्हती. मुलीने सांगितले की, आधीही आजोबांनी माझ्यासोबत असे केले होते. तुम्ही कामाला गेल्यावर तात्या मला ओढून ओढून घेत होते. तेव्हा मी बाहेर पळून गेल्याचे मुलीने आम्हाला सांगितले. आता दुसऱ्यावेळी लय मोठा किस्सा घडला. ही घटना काल रात्री घडली. पोलिसांनी आम्हाला सांगितले की, 'आम्ही तुमच्यासोबत आहोत. लय कालवा करु नका, लोकांना काही सांगू नका. कोणी मोर्चा वगैरे काढला तर दगडफेक होईल', असे मुलीच्या आईने सांगितले.

या मुलीच्या वडिलांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, मी रिक्षा चालवतो. मी काल रिक्षावर गेलो होतो. आमचा मुलगा घरात झोपला होता. हे सगळं संध्याकाळी सात वाजता घडलं. मुलीची आई नऊ वाजता कामावरुन घरी आली. वर्षभरापूर्वी सासऱ्यांनी माझा मोबाईल चोरला, तेव्हाच मी त्यांना घरातून हाकलले होते. मी बायकोला विचारलं होतं, तुला बाप हवा की नवरा, तेव्हा तिने माझी निवड केली. नंतर माझ्या सासऱ्याने कुठं घर घेतलं होतं, ते मला माहिती नाही. तो जवळपास राहतोय, हेच आम्हाला माहिती नव्हते. काल त्यांनी मुलीला खाऊ दिला. लहान मुलांना काही कळत नाही. त्यानंतर त्यांनी मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला, असे मुलीच्या वडिलांनी सांगितले.

## बिघाडामुळे 'वंदे भारत' थांबली; तत्पर दुरुस्तीमुळे ३ तासांत पुन्हा धावली

पुणे (दै. संध्या)

पुणे-हुबळी मार्गावरील वेगवान वंदे भारत एक्स्प्रेसला पॅन्टोग्राफमधील कार्बन स्ट्रिप तुटल्याने सोमवारी (दि. ४ मे) दुपारी अचानक थांबावे लागले. मात्र, रेल्वे प्रशासनाच्या तातडीच्या प्रतिसादामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला आणि तीन तासांच्या विलंबानंतर गाडी पुन्हा मार्गस्थ करण्यात आली. या घटनेदरम्यान प्रवाशांना काही काळ मनस्ताप सहन करावा लागला.
मिळालेल्या माहितीनुसार, पुणे स्थानकावरून सुटलेली ही गाडी जेजुरी-वाल्हेदरम्यान दातेवाडी येथे आडरानात थांबली. अचानक गाडी थांबल्याने प्रवाशांमध्ये काही काळ संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. कारण समजत नसल्याने अनेक प्रवासी गाडीतून खाली उतरून पुढील बाजूस गर्दी करत होते. प्राथमिक तपासात गाडीच्या पॅन्टोग्राफवरील कार्बन स्ट्रिप तुटल्यामुळे ओव्हरहेड वीजपुरवठा खंडित झाल्याचे स्पष्ट झाले. घटना समजताच रेल्वेच्या तांत्रिक पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत सर्व आवश्यक खबरदारी घेण्यात आली. तांत्रिक कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर काम करत दोषग्रस्त पॅन्टोग्राफ बदलून नवीन यंत्रणा बसवली. जवळपास तीन तासांच्या प्रयत्नांनंतर गाडी पुन्हा सुरू करण्यात यश आले. त्यानंतर गाडी सावधगिरीने पुढे मार्गस्थ करण्यात आली.

## NCMC कार्डची जादा दराने विक्री केल्यास परवाना रद्द होणार

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा इशारा

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वतीने सवलतधारक प्रवाशांना NCMC (National Common Mobility Card) स्मार्ट कार्डचे वितरण सुरू करण्यात आले आहे. यासाठी राज्यभरात ३००० हून अधिक अधिकृत विक्रेत्यांची नियुक्ती करण्यात आली असून, प्रत्येक आगार व प्रमुख बसस्थानकांवरही ही कार्डे उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

नवीन NCMC कार्ड घेणाऱ्या प्रवाशांसाठी १९९ रुपये, तर यापूर्वी स्मार्ट कार्ड असलेल्या प्रवाशांसाठी १४९ रुपये असा दर निश्चित करण्यात आला आहे. मात्र, काही अधिकृत विक्रेत्यांकडून सवलतधारक प्रवाशांना जादा दराने कार्ड विक्री केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, अवाजवी दर आकारणाऱ्या परवानाधारक विक्रेत्यांचे परवाने तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येतील, असा स्पष्ट इशारा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. यानुसार, काही विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

दरम्यान, एसटी महामंडळाने प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सवलती अधिक सुसंगत, पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने देण्यासाठी NCMC कार्ड कार्यप्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.




सध्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि 'अमृत' ज्येष्ठ नागरिक यांची नोंदणी व कार्ड वितरण प्रक्रिया सुरू असून, टप्प्याटप्प्याने इतर सवलतधारक प्रवाशांचाही या योजनेत समावेश करण्यात येणार आहे.

महामंडळाच्या सूचनेनुसार, लवकरच सर्व सवलतधारक प्रवाशांसाठी एसटी प्रवासादरम्यान NCMC कार्ड वापरणे अनिवार्य केले जाणार आहे. त्यामुळे प्रवास अधिक सुलभ होण्याबरोबरच सवलतींचा लाभ अचूक आणि डिजिटल पद्धतीने देणे शक्य होणार आहे. तसेच, NCMC कार्डद्वारे तिकीट वितरण, कार्ड टॉप-अप आणि इतर व्यवहारांसाठी एकसंध मानक कार्यपद्धती (SOP) निश्चित करण्यात आली आहे. सर्व आगार व्यवस्थापकांना ही कार्यपद्धती काटेकोरपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले असून, प्रवाशांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

या उपक्रमामुळे एसटी सेवा अधिक आधुनिक, पारदर्शक आणि प्रवासी-केंद्रित होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले असल्याचे मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

# सवाई माधवराव पेशवे यांची कारकीर्द अद्भूत

पुणे (दै. संध्या)

सवाई माधवराव यांचा जन्म १८ एप्रिल १७७४ रोजी झाला. सवाई माधवराव यांच्या जन्मापूर्वीच 'माधवराव' हे नाव निश्चित करण्यात आले होते. थोरले माधवराव यांच्या निधनानंतर त्यांच्या पिंडीला कावळा शिवला नाही. तेव्हा असे सांगितले गेले की मला मुलगा होईल तेव्हा त्याचे नाव माधवराव ठेवीन. तेव्हा पिंडाला कावळा शिवला. अशा नोंदी आहेत आणि त्यामुळे नारायणरावाच्या मुलाचे नाव परत माधवराव ठेवले गेले आणि ते सवाई माधवराव म्हणून ओळखले गेले. वयाच्या पाचव्या वर्षी त्यांची मुंज पर्वती टेकडी येथे पार पडली आणि त्यांचे लग्नही याच ठिकाणी झाले. जन्माच्या अवघ्या ४० व्या दिवशीच त्यांना पेशवेपद मिळाले ही इतिहासातील दुर्मिळ घटना आहे. सवाई माधवरावांचे नशीब एका बाजूने अत्यंत मोठे वाटते, जणू कोणालाही न लाभलेला अधिकारयोग त्यांच्या भाग्यात होता; पण त्याच वेळी



काही प्रसंग अत्यंत दुर्दैवीही ठरले. अशी माहिती इतिहास अभ्यासक मंदार लवाटे यांनी दिली.

श्री देवदेवेश्वर संस्थानच्या श्री सिद्धिविनायक सारसबाग मंदिराच्या २४२ व्या वर्धापनदिनानिमित्त इतिहास अभ्यासक मंदार लवाटे यांचे श्रीमंत सवाई माधवराव पेशवे या विषयावर व्याख्यान झाले. सारसबाग गणपती मंदिराच्या प्रांगणात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री देवदेवेश्वर संस्थानचे प्रमुख विश्वस्त रमेश भागवत, विश्वस्त सुधीर पंडित, पुष्कर पेशवा, जगन्नाथ लडकत यावेळी उपस्थित होते.

मंदार लवाटे म्हणाले, सवाई माधवरावांच्या जन्मासाठी केलेले नवस पूर्ण करण्यासाठी नाना फडणवीस यांनी मोठ्या प्रमाणात खर्च केला होता. या नवसफेडीसाठी त्या काळात सुमारे १ लाख ३४ हजार रुपयांचा खर्च झाला होता. शनिवारवाड्यात आगमनावेळी सवाई माधवरावांवर सोन्याची फुले उधळण्यात आली होती. मात्र, दुर्दैवाने वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. ते पुढे म्हणाले, नाना फडणवीसांना कल्पना होती की सवाई माधवरावांना सुद्धा मारण्याचे प्रयत्न केले जाणार, आणि ते त्यांच्या लहानपणापासूनच सुरू होते. पुरुषोत्तम दाजी हे त्यांच्या पायरीवर झोपायचे. एकदा एक बाईने केसांच्या बुचड्यात सुरी लपवली होती. मात्र तिला पकडण्यात आले. पटवर्धनांना या सर्व गोष्टींची पूर्ण कल्पना होती. पुढेही असे अनेक प्रयत्न होत राहिले, याचे लिखित पुरावे उपलब्ध आहेत. नाना फडणवीसांनी सवाई माधवरावांच्या भोवती त्रिस्तरीय (तीन घडींची) सुरक्षा व्यवस्था केली होती. त्या आतल्या कड्यात बळवंतराव नागनाथ नावाचा माणूस होता. हे सगळे लिखित स्वरूपात उपलब्ध आहे. इ.स. १७९४ मध्ये सवाई माधवरावांचा मृत्यू झाला. अनेकांना अशी आशा होती की ते आपल्या पूर्वजांसारखे महान शासक होतील. इ.स. १७८२ साली सारसबाग मंदिर बांधणीला सुरुवात झाली. प्रारंभी गणपतीची मूर्ती कुरुंदा दगडाची होती, असा समज प्रचलित होता; मात्र नव्या नोंदींनुसार पहिली मूर्ती संगमरवरी असल्याचे स्पष्ट झाले आहे. पुढे कालांतराने मूर्ती बदलण्यात आल्याचीही माहिती उपलब्ध झाली आहे. त्या काळात सारसबाग परिसर हा गावाबाहेरचा भाग असतानाही गणपतीची अत्यंत निगुतीने व भक्तिभावाने पूजा केली जात होती. पेशवे घराण्याचे आराध्य दैवत गणपती असल्यामुळे या मंदिराला विशेष महत्त्व होते.

रमेश भागवत यांनी प्रास्ताविक केले. पुष्कर पेशवा यांनी सूत्रसंचालन केले. जगन्नाथ लडकत यांनी आभार मानले.

## भीमाशंकर–आहुपे खोऱ्यात पाण्याचा थेंबही आटला

पुणे (दै. संध्या)

"आख्खं आयुष्य गेलं पाणी टिपण्यात... आमच्या डोक्यावरचा हंडा कधी खाली उतरला नाही," अशा केविलवाण्या शब्दांत भीमाशंकर परिसरातील तळेघर येथील आदिवासी महिलांनी आपली व्यथा मांडली. आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी पट्ट्यातील भीमाशंकर पाटण व आहुपे खोऱ्यात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून, जलस्रोत पूर्णतः आटल्याने नागरिकांना दुष्काळाच्या झळा सहन कराव्या लागत आहेत.

या भागातील विहिरी, शिवकालीन खडकातील टाक्या, बुडीत बंधारे, तळी, डव्हरी आदी सर्व जलस्रोत कोरडे पडले आहेत. उरलेले पाणीही दूषित झाल्याने साथीच्या आजारांचा धोका वाढला आहे. परिणामी, महिलांना दररोज दोन ते तीन किलोमीटर अंतर पार करत कूपनलिका व टाक्यांमधून रात्रभर पाणी भरावे लागत आहे. अनेकदा तासनतास प्रतीक्षा करूनही फक्त एक हंडा पाणी मिळते. पाण्याअभावी जनावरांचेही हाल सुरू असून, पिण्याच्या पाण्यासाठी ती सैरावैरा भटकताना दिसत आहेत. "डिंभे धरण जवळ असूनही आमच्या वाट्याला पाणी का येत नाही?" असा संतप्त सवाल आदिवासी बांधव उपस्थित करत आहेत. निवडणुकांच्या वेळी दिली जाणारी आश्वासने उन्हाळ्यात मात्र हवेत विरून जात असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली.

तालुक्यातील १५ गावे व ९५ वाड्यांसाठी आठ खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. मात्र, प्रत्यक्षात पश्चिम आदिवासी भागात अपुरा व अनियमित पुरवठा होत असून, टँकर व्यवस्थेत गैरव्यवहार होत असल्याच्या तक्रारी आहेत. ग्रामपंचायतींनी टँकरची मागणी करूनही प्रशासन व ठेकेदारांच्या अनागोंदी कारभारामुळे नागरिकांची वणवण सुरूच आहे.

# प्रत्येकाच्या वैयक्तिक कौशल्याला संधी मिळण्यासाठी संघभावना महत्वाची

## महावितरणचे संचालक श्री.राजेंद्र पवार यांचे प्रतिपादन : विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे पुण्यात थाटात उद्‌घाटन

पुणे (दै. संध्या)




सर्व खेळाडूंना एकत्रितपणे, एकजुटीने व सहकार्याने खेळूनच विजयाला गवसणी घालावी लागते. त्यामुळे कोणत्याही संघात सर्वप्रथम संघभावना निर्माण झाली की प्रत्येकाच्या वैयक्तिक कौशल्याला संधी मिळते. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये प्रामुख्याने विद्युत कंपन्यांमधील खेळाडूंचा सहभाग व नावलौकीक वाढत आहे, ही अभिमानाची बाब आहे असे प्रतिपादन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी बुधवारी (दि. ६) केले.

बालेवाडी (पुणे) येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलमध्ये एमएसईबी होल्डिंग कंपनीद्वारे आयोजित अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ४७व्या राष्ट्रीय कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलच्या तीन दिवसीय क्रीडास्पर्धेला प्रारंभ झाला. महावितरणचे संचालक श्री. राजेंद्र पवार यांच्याहस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करून या स्पर्धेचे उद्‌घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे प्रादेशिक संचालक (प्र.) श्री. सुनील काकडे, आयोजन समितीचे उपाध्यक्ष व मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप (महापारेषण)व श्री. अशोक घाडगे, मुख्य अभियंता श्री. धनराज पेठकर, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. भूषण कुलकर्णी , मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके (महावितरण) व पुरुषोत्तम वारजुरकर (महानिर्मिती), विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष श्री. जिग्नेश राय, सरचिटणीस श्री. नरेश कुमार, उपाध्यक्ष श्री. भरत पाटील, खजीनदार श्री. ललित गायकवाड यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

विद्युत नियंत्रण मंडळाच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा खऱ्या अर्थाने देशातील सर्व विद्युत कंपन्यांच्या खेळाडूंचे हक्काचे व्यासपीठ बनले आहे. सर्व विद्युत कंपन्या आणि त्यांच्या उत्कृष्ट खेळाडूंना देशपातळीवर एकत्र आणण्यासाठी या मंडळाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे, असे गौरवोद्गार संचालक श्री. पवार यांनी काढले. प्रादेशिक संचालक श्री. सुनील काकडे यांनी सांगितले, की विद्युत क्षेत्र धकाधकीचे आहे. त्यामुळे क्रीडा स्पर्धेतून कर्मचारी मानसिक व शारीरिकदृष्ट्या कणखर बनतात. यासह त्यांच्या मैदानातील शिस्तीने कार्यालयातील कार्यक्षमतेत देखील वाढ होते.

अत्यंत नेत्रदीपक व उत्साहात झालेल्या स्पर्धेच्या उद्‌घाटन सोहळ्यात सर्व खेळाडूंनी संचलन करीत पाहुण्यांना मानवंदना दिली. यावेळी काश्मिर ते कन्याकुमारीपर्यंत विविध राज्यांतील सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाचे खजिनदार श्री. ललित गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संतोष पाटणी, रामगोपाल अहीर, भक्ती जोशी, सोनाली बाविस्कर, स्वागती सोळंकुरे यांनी केले तर श्री. अशोक घाडगे यांनी आभार मानले.

या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्रासह गुजरात, हरियाणा, तेलंगाणा, राजस्थान, उत्तराखंड, पंजाब, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, दिल्ली आदी राज्यांतील सरकारी व खासगी विद्युत कंपन्यांचे ४१ संघ आणि सुमारे ५३८ महिला व पुरुष खेळाडू सहभागी झाले आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पर्वती पायथा येथे अल्पवयीन चिमुरडीवरील अत्याचाराच्या घटने विरोधात संतप्त आंदोलन

मुंबई (दैनिक संध्या) : आज पर्वती पायथा परिसरात एका अवघ्या नऊ वर्षांच्या चिमुरडीवर तिच्याच सख्ख्या आजोबांनी अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याच्या धक्कादायक घटनेच्या निषेधार्थ तीव्र आंदोलन करण्यात आले. या अमानुष आणि संतापजनक घटने विरोधात स्थानिक महिलांसह सामाजिक कार्यकर्त्यांनी आरोपीच्या प्रतीकात्मक तिरडीचे आंदोलन करत निषेध नोंदवला. या आंदोलनादरम्यान आरोपीच्या प्रतीकात्मक तिरडीला चपला मारत परिसरात फिरवण्यात आले. “अशा नराधमांना समाजात जागा नाही”, “लहान मुलींवरील अत्याचार थांबवा”, “महिलांच्या सुरक्षिततेसाठी कठोर कारवाई करा” अशा जोरदार घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी घटनेच्या परिसरातील अनेक स्थानिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आंदोलनात माननीय रूपाली पाटील, सामाजिक कार्यकर्त्या संगीता तिवारी, प्रिया सूर्यवंशी यांनी सहभाग घेत पीडितेला न्याय मिळवून देण्याची ठाम भूमिका मांडली. या संपूर्ण आंदोलनाचे नियोजन व आयोजन भारती लोंढे यांनी केले होते. उपस्थित महिलांनी प्रशासनाकडे आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी केली असून, अल्पवयीन मुलींवरील वाढत्या अत्याचारांच्या घटनांबाबत तीव्र संताप व्यक्त केला. “आज जर अशा विकृत प्रवृत्तीविरोधात समाज रस्त्यावर उतरला नाही, तर उद्या प्रत्येक घरातील मुलगी असुरक्षित होईल. अशा नराधमांना तात्काळ कठोर शिक्षा झालीच पाहिजे,” अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

### थेऊर येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न; आरोपी पोलिसांच्या ताब्यात



लोणी काळभोर(दैनिक संध्या) : थेऊर परिसरात एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न झाल्याचे उघडीस आले असुन परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले. संबंधित मुलगी ( वय ६ वर्ष)हि आजोबांच्या घरी सुट्टीला आली होती.घराशेजारी राहणारा आरोपीने अल्पवयीन मुलीशी अयोग्य वर्तन केले .घाबरलेल्या मुलीने तत्काळ झालेला प्रकार आपल्या आईला सांगितला.अल्पवयीन मुलीच्या आईने लोणी काळभोर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपीचा शोध घेऊन त्याला अटक केली. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली.या घटनेमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.लोणी काळभोर पोलिसांनी आरोपीस अटक करून न्यायालयात हजर केले आहे.

### तळ्यात बुडून जुळ्या भावंडांचा मृत्यू



नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील तळेरान येथील वसई परिसरात असलेल्या तळ्यात दोन जुळ्या बहीण भावंडांचा मंगळवार दि. 5 मे रोजी बुडून मृत्यू झाला. श्रावणी रामदास साबळे व गणेश रामदास साबळे (वय 11वर्ष. रा. तळेरान -वसईवाडी ता. जुन्नर ) अशी मृत्यू झालेल्या मुलांची नावे आहेत. ही दोन्ही मुले घोडेगाव येथील इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये शिक्षण घेत होती. उन्हाळी सुट्टी असल्यामुळे श्रावणी व गणेश ही दोन्ही भावंडे आपल्या मोठ्या बहिणीसोबत गावाजवळील तळ्यावर कपडे धुण्यासाठी गेली होती.बहीण कपडे धुण्यात व्यस्त असताना श्रावणी व गणेश दोघेही खेळता खेळता पाण्यात उतरले. पोहण्याचा प्रयत्न करत असताना ते खोल पाण्यात गेले.व दोघेही पाण्यात बुडाले. हा प्रकार बहिणीच्या लक्षात येताच तिने आरडाओरडा केल्याने मदतीची हाक मारल्यानंतर ग्रामस्थांनी तात्काळ तळ्याकडे धाव घेत शोधकार्य सुरु केले.ग्रामस्थांच्या अथक प्रयत्नानंतर दोघांनाही पाण्याच्या बाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्यांना ओतूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलविण्यात आले. मात्र,डॉक्टरांनी तपासल्यानंतर दोघांनाही मृत घोषित केले.या घटनेमुळे साबळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण गाव शोकमग्न झाले आहेत. या घटनेचा पुढील तपास ओतूर पोलीस स्टेशन करत आहे.

### कल्याण -अहिल्यानगर महामार्गावरील अपघातात तीन ठार, तीन जखमी

नारायणगाव (दैनिक संध्या) : कल्याण -अहिल्यानगर महामार्गावर वैशाखखरे येथील धोकादायक वळणावर एसटी बस व स्कॉर्पिओ गाडी यांच्यात मंगळवार दि. 5 मे रोजी समोरासमोर धडक होऊन 3 जण जागीच ठार तर 3 गंभीर जखमी झाले आहेत. मुरबाडहून माळशेजच्या दिशेने जाणारी एसटी बस आणि समोरून येणारी स्कॉर्पिओ गाडी यांची वैशाखरे घाट परिसरात जोरदार धडक झाली. अपघात इतका भीषण होता की स्कॉर्पिओ गाडीचा पूर्ण चक्काचूर झाला. अपघातानंतर स्थानिक ग्रामस्थ व बचाव पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात हलविले. घटनेमुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.



# अत्याधुनिक निदान सुविधांना बळकटी देण्यात येणार

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : सीएसआर प्रकल्पांतर्गत अत्याधुनिक स्वयंचलित ट्यूब लेबलिंग व बारकोडिंग (एपीटीएल) प्रणालींची स्थापना**

मुंबई (दै. संध्या) :

देशातील अग्रगण्य कर्करोग उपचार व संशोधन केंद्र असलेल्या टाटा मेमोरियल हॉस्पिटल येथे निदान व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी कॉर्पोरेट सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत महत्त्वपूर्ण प्रकल्प राबविण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत अत्याधुनिक स्वयंचलित ट्यूब लेबलिंग व बारकोडिंग प्रणाली (एपीटीएल) या तीन प्रगत यंत्रणांची यशस्वी स्थापना करण्यात आली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या नव्या प्रणालींमुळे नमुन्यांचे अचूक लेबलिंग आणि बारकोडिंग स्वयंचलित पद्धतीने होणार असून, मानवी त्रुटी कमी करण्यास मोठी मदत होणार आहे. परिणामी, निदान प्रक्रियेत अचूकता वाढणार असून रुग्णांच्या सुरक्षिततेत लक्षणीय सुधारणा होईल. तसेच, रुग्णालयातील क्लिनिकल वर्कफ्लो अधिक सुलभ आणि कार्यक्षम होणार आहे.

विशेषतः कर्करोगासारख्या गंभीर आजारांमध्ये निदानातील अचूकता आणि वेळेवर उपचार अत्यंत महत्त्वाचे असतात. एपीटीएल प्रणालीमुळे नमुने हाताळण्यातील गोंधळ, विलंब आणि चुकीची ओळख यांसारख्या समस्या मोठ्या प्रमाणात कमी होतील. त्यामुळे डॉक्टरांना अधिक विश्वासार्ह अहवाल मिळून उपचार प्रक्रियेत गती येईल.

या उपक्रमामुळे रुग्णालयातील प्रयोगशाळा व्यवस्थापन आधुनिक तंत्रज्ञानाशी सुसंगत होऊन, जागतिक दर्जाच्या आरोग्य सेवांकडे आणखी एक पाऊल टाकले गेले आहे. सीएसआर च्या माध्यमातून अशा प्रकारच्या अत्याधुनिक सुविधांची उभारणी केल्याने सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्यास मोठी मदत होत आहे. या उपक्रमासाठी इंडियन ऑइल कंपनीने सहकार्य केले आहे त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आभार व्यक्त केले.

याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की "टाटा मेमोरियल रुग्णालयात उभारण्यात आलेल्या या अत्याधुनिक एपीटीएल प्रणालीमुळे निदान प्रक्रियेत अचूकता, पारदर्शकता आणि गती वाढणार आहे. रुग्णांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याची ही दिशा महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे. सीएसआर च्या माध्यमातून आरोग्य क्षेत्रात होणारी ही गुंतवणूक भविष्यात अधिक सक्षम आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा देण्यासाठी मोलाची ठरेल."

## शाह यांच्या चाणक्य नीतीचा प्रभाव : सर्वत्र फुलले कमळ

नवी दिल्ली (दै. संध्या) :

बंगालची ती भूमी, जी कधीकाळी रवींद्रनाथ टागोर यांच्या संगीताने, स्वामी विवेकानंद यांच्या आध्यात्मिक तेजाने आणि शरतचंद्र चट्टोपाध्याय यांच्या कालातीत साहित्यकृतींनी सुगंधित होती, ती अनेक दशकांपासून अशा शांततेत गुरफटली होती जी विकासाची नव्हे, तर ऱ्हासाची चाहूल देणारी होती. हा तोच पश्चिम बंगाल होता ज्याने कधीकाळी संपूर्ण देशाला दिशा दिली होती, परंतु काळाच्या ओघात तो अशा राजकीय अंधाऱ्या मार्गावर ढकलला गेला जिथे फक्त हिंसा आणि सूडाचे आवाज घुमत होते. ३५ वर्षे कम्युनिस्टांच्या “रेड कॉरिडॉर”ने बंगालचा औद्योगिक कणा कमकुवत केला आणि मागील १५ वर्षांत ऑल इंडिया तृणमूल काँग्रेसच्या सत्तेखाली राज्य आणखी भ्रष्टाचार, तुष्टीकरण आणि अराजकतेच्या दलदलीत अडकले. जूट मिल्स बंद झाल्याने सकाळचे सायरन शांत झाले, उद्योगधंदे ठप्प पडले आणि रोजगाराच्या शोधात बंगालचा



तरुण स्वतःची भूमी सोडण्यास भाग पडला. समृद्ध सांस्कृतिक ओळख असलेल्या या राज्यात रवींद्र संगीताच्या सुरांची जागा बॉम्बस्फोट आणि गोळीबाराच्या आवाजांनी घेतली. संदेशखालीपासून आर. जी. कर मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयापर्यंत महिलांच्या शोषणाच्या आणि प्रशासनिक निष्काळजीपणाच्या कथा बंगालच्या आत्म्याला घाव घालत होत्या.

परंतु २०२६ च्या कडक उन्हाळ्याने एक नवे पर्व लिहायला सुरुवात केली. भारतीय राजकारणातील आधुनिक “चाणक्य” म्हणून ओळखले जाणारे अमित शाह जेव्हा नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर ठाम निर्धार आणि डोळ्यांत भविष्याचा स्पष्ट आराखडा दिसत होता.

## जायकासह महाराष्ट्रात वैद्यकीय क्षेत्र बळकट करण्यासाठी नवे पाऊल

*मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : जायकाकडून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता*

मुंबई (दै. संध्या) :

महाराष्ट्राच्या विकास प्रवासात विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान देणाऱ्या (जायका) या आंतरराष्ट्रीय संस्थेसोबत आता वैद्यकीय क्षेत्रातही सहकार्याची नवी दिशा निर्माण होणार आहे. राज्यातील वैद्यकीय सेवा अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी जायका महाराष्ट्रासोबत भागीदारी करण्यास उत्सुक असून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता घेण्यास मंत्रीमंडळाने मान्यता दिली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की यापूर्वी आसाम आणि तामिळनाडू सारख्या राज्यांमध्ये यशस्वी प्रकल्प राबविल्यानंतर, जायका आता महाराष्ट्रातही ‘मेडिकल केअर सिस्टम’ मजबूत करण्यासाठी पुढाकार घेत आहे. विशेषतः राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागासोबत समन्वय साधून हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रस्तावित भागीदारीत खालील महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे, सध्याच्या शासकीय वैद्यकीय, पॅरामेडिकल आणि नर्सिंग महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांचा विकास, आधुनिक निदान (डायग्नोस्टिक) यंत्रणा अधिक सक्षम करणे विशिष्ट आजारांसाठी ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’ उभारणे. नवीन नर्सिंग आणि पॅरामेडिकल महाविद्यालयांची स्थापना करून प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे. आरोग्य व्यवस्थापन प्रणाली अधिक कार्यक्षम करण्यासाठी सहाय्य, राज्य सरकारच्या वतीने या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला असून, वैद्यकीय शिक्षण विभागाने आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याची तयारी दर्शविली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात यापूर्वीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. याशिवाय जळगांव, लातूर, बारामती, मिरज, कोल्हापूर, नंदूरबार व गोंदिया या सात जिल्ह्यांमध्ये १०० प्रवेश क्षमतेचे शासकीय बीएस्सी नर्सिंग विद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयांच्या पायाभूत सुविधांकरिता तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध व्हावी, याकरिता ‘स्ट्रेन्थनिंग टर्शरी हेल्थ केअर डिलीव्हरी, मेडिकल एज्युकेशन सिस्टीम अ‍ॅण्ड नर्सिंग सिस्टीम इन महाराष्ट्र’ हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी जपानच्या इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सीकडून ३ हजार ७०८ कोटींचे वित्तीय सहाय्य उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पात वर्धा, पालघर, रत्नागिरी, अहिल्यानगर या नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी तसेच मुंबईतील जीटी, सेंट जॉर्ज, धुळे, सोलापूर, अंबेजोगाई, अकोला, आयजीएमसी नागपूर, रत्नागिरी, पालघर, धाराशिव येथील नर्सिंग महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करण्यात येणार आहे. तर बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर येथील नर्सिंग महाविद्यालयांचे बांधकाम करण्यात येणार आहे. याशिवाय अहिल्यानगर, भंडारा, गडचिरोली, हिंगोली, जालना, मुंबई, नाशिक, परभणी, सातारा, पालघर, रत्नागिरी, वर्धा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी यंत्रसामुग्री उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. तसेच भारत-जपान शैक्षणिक आदान प्रदान कार्यक्रमांतर्गत रूग्णालय व्यवस्थापन व प्रशासन मानवसंसाधन विकास यांच्या क्षमता वृध्दीसाठी तरतूद करण्यात येणार आहे.

> या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील आरोग्यसेवा अधिक दर्जेदार, सुलभ आणि आधुनिक होईल .त्यामुळे राज्यातील नागरिकांना उत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.एकूणच, जायका आणि महाराष्ट्र सरकार यांच्यातील ही प्रस्तावित भागीदारी आरोग्य क्षेत्रातील विकासासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## अ‍ॅपच्या पलीकडे : बँकिंगसाठी व्यवसाय अनुभव ही पुढील सीमा का आहे?

नवी दिल्ली (दै. संध्या) :

भारतीय बँकिंग क्षेत्रात शांत क्रांती होत आहे. गेल्या दशकात, आम्ही "फ्रंट-एंड" मध्ये गुंतलो होतो, ज्यात आकर्षक अ‍ॅप्स, 10-सेकंदांचे कर्ज मंजूर करणे आणि घर्षणरहित UPI पेमेंट्स यांचा समावेश होता. आम्ही स्क्रीनवर सोयीस्करता निर्माण केली. परंतु 2030 कडे पाहताना, स्पर्धात्मक युद्धभूमी बदलत आहे. जिथे प्रत्येक निओ-बँक आणि फिनटेक सुंदर इंटरफेस देतात, तिथे "ग्राहक अनुभव" (CX) सामान्य झाला आहे. आता खरा फरक म्हणजे मी ज्याला व्यवसाय अनुभव (BX) म्हणतो: अदृश्य, लवचिक यंत्रणा जी आम्ही आमच्या ग्राहकांना दिलेल्या वचनाला शक्ती देते - श्री. लक्ष्मण वेलायुथम, प्रमुख – मुख्य विपणन अधिकारी, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक

फ्रंट-एंडचा भ्रम- बँकिंग अ‍ॅपला लक्झरी कारच्या डॅशबोर्डसारखे समजा. ते भव्य दिसते, परंतु जर इंजिन (आमची मुख्य बँकिंग प्रणाली) बिघडले किंवा सुरक्षा प्रणाली (अनुपालन आणि सायबरसुरक्षा) अयशस्वी झाली, तर ड्रायव्हिंगचा अनुभव कोसळतो. ग्राहक-केंद्रित चॅनेल मुख्य बँकिंग प्रणाली, अनुपालन फ्रेमवर्क, सायबरसुरक्षा नियंत्रणे आणि सेवा वर्कफ्लो यांच्या समन्वयावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात.

अनेक बँकांसाठी, हा



फरक अस्तित्वाचा आहे. आम्ही वाढत्या भारताच्या आकांक्षा पूर्ण करतो, ज्यात बंगळूरमधील गिग वर्करपासून ते कोईम्बतूरमधील MSME मालकापर्यंत आणि बंगळूरमधील फॅमिली ऑफिसपर्यंत यांचा समावेश आहे. त्यांना फक्त अ‍ॅपची गरज नाही; त्यांना अशा संस्थेची गरज आहे जी महत्त्वाच्या वेळी काम करते. बँकिंग वाढीचा पुढील टप्पा केवळ प्रमाणाने नव्हे, तर सातत्याने सखोल वैयक्तिकृत आणि विश्वासार्ह सेवा प्रदान करण्याच्या क्षमतेने चालविला जाईल, हा फायदा पृष्ठभागावरील इंटरफेसऐवजी कार्यात्मक सामर्थ्यामध्ये रुजलेला आहे.

जर CX ग्राहकाला कसे वाटते याबद्दल असेल, तर BX हे बँकेने ती भावना निर्माण करण्यासाठी कसे कार्य करते याबद्दल आहे.

- केवळ ऑटोमेशनपेक्षा कर्मचाऱ्यांचे सक्षमीकरण
- स्पर्धात्मक फायदा म्हणून अनुपालन
- भागीदार इकोसिस्टम

कार्यक्षमता

पुढील मार्ग: कंटाळवाणे सुंदर आहे- हा उत्कृष्ट व्यवसाय अनुभव निर्माण करण्यासाठी, आपण "कंटाळवाण्या" गुंतवणुकीचा स्वीकार केला पाहिजे, ज्या अ-ग्लॅमरस, पायाभूत, मिशन-क्रिटिकल प्रणाली आहेत ज्या बातम्यांमध्ये येत नाहीत परंतु सर्व फरक करतात.

आमच्या कर्ज देण्याच्या वर्कफ्लोचा विचार करा. आज कर्ज अर्ज डझनभर मॅन्युअल पायऱ्या सुरू करतो: दस्तऐवज पडताळणी, क्रेडिट ब्युरो तपासणी, अनुपालन तपासणी आणि निधी हस्तांतरण अधिकृतता. प्रत्येक हस्तांतरण एक संभाव्य अपयशाचा बिंदू आहे. सुव्यवस्थित, सुशासित डिजिटल वर्कफ्लो मुख्य बँकिंग प्रक्रियेमध्ये अंदाजक्षमता, नियंत्रण आणि कार्यात्मक लवचिकता सुधारण्यास मदत करतात. रोख-प्रवाहाच्या कठीण परिस्थितीत कार्यरत असलेल्या व्यवसायांसाठी, कार्यात्मक निश्चितता महत्त्वपूर्ण असू शकते.

गुंतवणूक? प्रक्रिया ऑटोमेशन प्लॅटफॉर्म, मुख्य बँकिंग प्रणालींसह API एकीकरण आणि कर्मचाऱ्यांचे पुनर्शिक्षण. अ-ग्लॅमरस. आवश्यक.

आपण अशा युगात जगतो जिथे डेटा सुरक्षा घटनांचे तात्काळ आर्थिक परिणामांपेक्षा अधिक दूरगामी परिणाम होऊ शकतात. आमचे अनेक ग्राहक अनेकदा प्रथमच कर्ज घेणारे, प्रथमच डिजिटल वापरकर्ते असतात. जर आपण सुरक्षा त्रुटीमुळे तो विश्वास गमावला, तर ते दुसऱ्या फिनटेकला जात नाहीत; ते पूर्णपणे डिजिटल बँकिंगमधून माघार घेतात. गुंतवणूक? प्रगत धोका शोध प्रणाली, नियमित प्रवेश चाचणी, सायबरसुरक्षा कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि अनुपालन प्रमाणपत्रे. महाग. न टाळता येण्याजोगे.

आज बहुतेक बँका भूतकाळातील विश्लेषणावर चालतात. काय घडले आहे हे समजून घेण्यासाठी ते ऐतिहासिक डेटाचे पुनरावलोकन करतात. "गेल्या तिमाहीत डिफॉल्ट दर वाढले" अशी विधाने अहवाल देण्यासाठी उपयुक्त आहेत, परंतु ती मूळतः प्रतिक्रियात्मक राहतात.

> **बँकिंगमध्ये "बोरिंग" का जिंकते**
>
> बँकांना इतर व्यवसायांपासून वेगळे काय करते ते येथे आहे: आम्ही पैशांचे व्यवहार करतो. आम्ही विश्वासाचे व्यवहार करतो. आम्ही भविष्याचे व्यवहार करतो. ही चमकधमक असलेल्या नवोपक्रम प्रदर्शनाची जागा नाही. ही कंटाळवाणी विश्वासार्हतेची जागा आहे.

## व्हीएफएस ग्लोबल कन्सोर्टियमला महत्त्वाचा करार प्राप्त

नवी दिल्ली (दै. संध्या) :

सरकारी सेवा सुरक्षितपणे पुरवणारी जागतिक तंत्रज्ञान सेवा क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी 'व्हीएफएस ग्लोबल' (VFS Global) आणि 'वी एक्सेल सॉफ्टवेअर प्रायव्हेट लिमिटेड' (WE Excel Software Pvt. Ltd.) यांच्या कन्सोर्टियमने (Consortium) महाराष्ट्र सरकारच्या नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक (IGR) विभागाकडून पाच वर्षांचे कंत्राट प्राप्त केले. याअंतर्गत राज्यातील मालमत्ता नोंदणी प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि नागरिक-केंद्रित करण्यासाठी महाराष्ट्रात टप्प्याटप्प्याने ६० अत्याधुनिक 'मॉडेल सब-रजिस्ट्रार कार्यालये' (SROs) सुरू केली जातील. हे कन्सोर्टियम महाराष्ट्रातील या मॉडेल सब-रजिस्ट्रार कार्यालयांची संपूर्ण उभारणी करेल, ज्यात मालमत्ता नोंदणी सेवांचे आधुनिकीकरण करण्यासाठी अत्याधुनिक डिजिटल पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षित कर्मचारी रुजू केले जातील. ही अत्याधुनिक केंद्रे जलद कार्यवाही व प्रभावी सेवा देण्यासाठी डिझाइन केली जाणार असून, प्रशस्त, आधुनिक आणि पूर्णपणे वातानुकूलित सुविधा उपलब्ध असतील. प्रत्येक केंद्रात आरामदायी प्रतीक्षालय, वाय-फाय सुविधा, अखंडित प्रक्रिया सक्षम करणारी मजबूत डिजिटल प्रणाली आणि नागरिकांना सहाय्य करणारे प्रशिक्षित कर्मचारी असतील. याशिवाय, अल्पोपहार आणि पिण्याच्या पाण्याची सोय यांसारख्या अतिरिक्त सुविधांमुळे नागरिकांचा अनुभव अधिक सुखद होईल. रविंद्र बिनवडे, नोंदणी महानिरीक्षक (IGR), महाराष्ट्र सरकार, म्हणाले की, "मॉडेल ऑफिसची संकल्पना ही सध्याच्या मालमत्ता नोंदणी प्रणालीतील अडथळे दूर करण्यासाठी आखलेला एक धोरणात्मक उपक्रम आहे. अनेक वर्षांपासून नागरिकांना लांब रांगा, गर्दी असलेली सब-रजिस्ट्रार कार्यालये आणि योग्य वातावरणाचा अभाव या समस्यांना सामोरे जावे लागले आहे. या आव्हानांवर मात करण्यासाठी विभाग 'मॉडेल सब-रजिस्ट्रार ऑफिस' हा उपाय राबवत असून ६० समर्पित कार्यालये स्थापन केली जात आहेत. ही कार्यालये पूर्णपणे शासनाच्या नियंत्रणाखाली राहतील आणि विभागीय अधिकाऱ्यांमार्फतच कार्यरत असतील, ज्यामुळे नियामक शिस्त अबाधित राहील.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पासाठी नवयुगाचे केले कौतुक

मुंबई (दै. संध्या) :

Navayuga Engineering Company Limited (NECL) ने मुंबई-पुणे एक्सप्रेसवे ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पाचा भाग म्हणून जगातील सर्वात रुंद भूमिगत बोगदा तयार करून कारकिर्दीतला दुसरा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड पटकावला आहे. हा अभूतपूर्व पराक्रम भारताच्या



पायाभूत सुविधांच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला असून अभियांत्रिकी कौशल्य आणि आपल्या क्षमता ओलांडण्याच्या धाडसी दृष्टिकोनाचे प्रतीक आहे.

अनेक वर्षांपासून सह्याद्री पर्वतरांगांमधून होणारा मुंबई-पुणे प्रवास निसर्गरम्य असला तरी वेळखाऊ आणि अनिश्चित होता. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून महाराष्ट्र शासनाने १३.३ किमी ‘मिसिंग लिंक’ जोडण्याची संकल्पना मांडली. हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDCL) यांनी साकारला आणि नवयुगा इंजिनिअरिंग कंपनी लिमिटेडने प्रत्यक्षात आणला. महाराष्ट्र दिनी उद्घाटन झालेला हा ‘मिसिंग लिंक’ प्रकल्प अभियांत्रिकी उत्कृष्टतेचे प्रतीक ठरला आहे. खंडाळा घाटातील वाहतूक टाळून हा मार्ग प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी कमी करतो आणि महाराष्ट्रातील महत्त्वाच्या वाहतूक मार्गावरील गर्दी लक्षणीयरीत्या कमी करतो.

या ऐतिहासिक क्षणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्रा पवार आणि नवयुगा इंजिनिअरिंगचे व्यवस्थापकीय संचालक श्री चिंत श्रीधर उपस्थित होते.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

**जाहीर नोटीस**

याद्वारे सर्व संबंधितान कळविण्यात येते कि,सासवड येथील महावितरण च्या विभागीय कार्यालय परिसरातील विहिरीतील गाळ काढून विहिरीला आर सी सी रिंग टाकाणेसाठी अडथळा ठरणारे वडाचे झाड काढण्यासाठी परवानगी देण्यासाठी. सदय परिस्थितीत सासवड उपकेंद्र येथे पाणी पुरवठा कमी प्रमाणात होत असून उपकेंद्र सुस्थित कार्यरत करण्यासाठी योग्य प्रमाणात पाणी पुरवठा होणे आवश्यक आहे. तरी सदर झाड काढणेबाबत परवानगी देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दिनांक.१६.०५.२०२६ तारखेपर्यंत लेखी स्वरुपात सासवड महावितरण विभाग यांच्या नावे कळवावे.

सदर दिनांकानंतर हरकती अथवा तक्रारी प्राप्त न झाल्यास झाड काढणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

PRO NO:-PRO/BMTZ/26/26-27

कार्यकारी अभियंता, सासवड विभाग.

# पिंपरी-चिंचवडमध्ये दुर्गा टेकडी वर बिबट्याचा वावर

**देहूरोड, रावेत परिसरात शोधमोहीम सुरू**



पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील देहूरोड परिसरात बिबट्याच्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. देहूरोड येथील ॲम्युनिशन फॅक्टरी परिसर, दुर्गा देवी टेकडी, रावेत, म्हस्के वस्ती आदी भागांत गेल्या काही दिवसांपासून बिबट्याची हालचाल आढळून आल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर वनविभागाने तातडीने सर्च ऑपरेशन सुरू केले आहे. संबंधित परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये बिबट्याची हालचाल स्पष्टपणे कैद झाली असून, त्या फुटेजच्या आधारे वनविभागाकडून शोधमोहीम राबविण्यात येत आहे. ॲम्युनिशन फॅक्टरीचा विस्तीर्ण परिसर आणि दुर्गा देवी टेकडीचा डोंगराळ भाग यामुळे शोधकार्यात अडचणी येत असल्या तरी वनविभागाची विशेष पथके विविध भागांत तैनात करण्यात आली आहेत. दरम्यान, बिबट्याच्या वावरामुळे नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी नागरिकांनी घराबाहेर पडू नये, लहान मुलांना एकटे सोडू नये तसेच पाळीव प्राण्यांची काळजी घ्यावी, असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे. परिसरात कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ वनविभाग किंवा स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सध्या वनविभागाकडून या भागात गस्त वाढवण्यात आली असून, बिबट्याला सुरक्षितरीत्या जेरबंद करण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुरू आहेत.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेची धडक कारवाई

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत शहरातील विविध प्रभागांमध्ये फूटपाथ व रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्यासाठी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली १ मे ते १५ मे दरम्यान शहरात पदपथ मुक्त पंधरवडा मोहीम आखाण्यात आली आहे. या अंतर्गत शहरातील विविध भागात मुख्यालय अतिक्रमण विभागाचे उप आयुक्त अतुल पाटील आणि संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात येत आहे.

फ प्रभागात २ व ३ मे रोजी RTO रोड, त्रिवेणी नगर चौक ते तळवडे चौक, तसेच देहू-आळंदी रोड परिसरात अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. या कारवाईत टपऱ्या, हातगाड्या, प्लास्टिक कॅरेट, लोखंडी रॅक, स्टँड बोर्ड, खुर्च्या, टेबल यांसह मोठ्या प्रमाणात साहित्य जप्त करण्यात आले. तसेच भाजीपाला व फळ विक्रेत्यांकडील टमाटर, भेंडी, बटाटा, काकडी, मिरची यांसारखा शेकडो किलो भाजीपाला जप्त करून इस्कॉन अन्नामृत अन्नछत्र येथे जमा करण्यात आला.





याचप्रमाणे प्रभाग क्रमांक १, चिखली येथे सत्संग रोड ते पिंगळे चौकपर्यंतचा संपूर्ण रस्ता अतिक्रमणमुक्त करण्यात आला असून सर्व हातगाड्या व टपऱ्यांवर कारवाई करून साहित्य जप्त करण्यात आले.

इ क्षेत्रीय कार्यालय भोसरी अंतर्गत ३ व ४ मे रोजी आळंदी रोड व भोसरी नाट्यगृह परिसरात कारवाई करण्यात आली. या मोहिमेत हातगाड्या, इलेक्ट्रिक काटे, स्टँडी बोर्ड, टेबल, छत्र्या तसेच कपडे व चप्पलांचे गाठोडे जप्त करण्यात आले. या कारवाईसाठी MSF जवान, पोलीस कर्मचारी व महापालिका कर्मचारी यांचा समन्वय ठेवण्यात आला. ड प्रभाग, रहाटणी परिसरात ४ मे रोजी जगताप डेअरी ते पिके चौक, कुणाल आयकॉन रोड व गोविंद गार्डन परिसरात मोहीम राबविण्यात आली. येथे कूलर, हातगाड्या, पाणीपुरी ठेले, प्लास्टिक कॅरेट यांसह विविध साहित्य जप्त करण्यात आले. तसेच फळ विक्रेत्यांकडील आंबे, केळी व नारळ मोठ्या प्रमाणात जप्त करून अन्नछत्रात जमा करण्यात आले.

याशिवाय पिंपळे सौदागर परिसरातही फूटपाथवरील अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू असून ह झोनमध्येही पदपथ अतिक्रमणमुक्त मोहिमेला गती देण्यात आली आहे.

महापालिकेने जप्त केलेले सर्व साहित्य संबंधित गोडाऊनमध्ये जमा करण्यात आले असून, नागरिकांनी सार्वजनिक रस्ते व फूटपाथ मोकळे ठेवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या सातत्यपूर्ण कारवाईमुळे शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यास आणि पादचाऱ्यांना सुरक्षित व मोकळा मार्ग उपलब्ध होण्यास मोठी मदत होत आहे.

**कारवाईवेळी सहभागी कर्मचारी**

सदर अतिक्रमणविरोधी कारवाईदरम्यान महापालिकेचे अतिक्रमण निरीक्षक, बीट निरीक्षक, प्रशासन अधिकारी तसेच विविध प्रभागांतील अधिकारी व कर्मचारी सक्रियपणे सहभागी झाले होते. या मोहिमेत एम जवानांची मोठ्या प्रमाणावर मदत घेण्यात आली असून, महापालिकेचे कर्मचारी, कंत्राटी मजूर, ड्रायव्हर, कॅमेरामन तसेच पोलीस कर्मचारी यांनी समन्वय साधून कारवाई यशस्वी केली. विविध प्रभागांमध्ये संबंधित बीट निरीक्षकांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली असून, सर्व घटकांनी संयुक्तपणे काम करत शहरातील फूटपाथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी केली.

## थोडक्यात पण महत्वाचे...





### दूषित व अपुरा पाणीपुरवठा आणि गोठा करावरून नगरसेवक विकास साने आक्रमक

■ निषेध बॅनरसह सभागृहात प्रवेश

पिंपरी (दैनिक संध्या) : दूषित आणि अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांच्या प्रश्नावरून तसेच गोठा कराच्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक विकास साने यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली. निषेधाचे बॅनर परिधान करून त्यांनी महापालिकेच्या सभागृहात प्रवेश करत प्रशासनाचा निषेध नोंदवला. चिखली, मोरे वस्ती, ताम्हाणे वस्ती, म्हेत्रे वस्ती आणि साने चौक परिसरात गेल्या काही दिवसांपासून कमी दाबाने व दूषित पाणीपुरवठा होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. अनेक भागांमध्ये नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नसल्याने महिलांना व ज्येष्ठ नागरिकांना तासन्तास पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. काही ठिकाणी नागरिकांना खासगी टँकरचा आधार घ्यावा लागत असून त्यामुळे आर्थिक भारही वाढला आहे. दूषित पाण्यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक विकास साने यांनी प्रशासनावर जोरदार टीका करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. "नागरिकांना मूलभूत सुविधा देण्यात प्रशासन अपयशी ठरत असताना गोठा कराच्या माध्यमातून शेतकरी आणि स्थानिक नागरिकांवर अन्याय केला जात आहे. दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रशासनाने तातडीने योग्य ती पावले उचलली नाहीत तर तीव्र आंदोलन छेडले जाईल," असा इशारा त्यांनी दिला. महापालिका सभागृहात निषेध बॅनर परिधान करून प्रवेश केल्याने काही काळ वातावरण तणावपूर्ण झाले होते. या प्रश्नावर प्रशासनाने लवकरात लवकर ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडूनही करण्यात येत आहे.

चाकू, गुंगीचे औषध आणि स्प्रे जप्त



### बाळ चोरण्याच्या संशयावरुन काळभोर नगर येथे महिलेला नागरिकांनी पकडले

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील काळभोर नगर परिसरात लहान बाळ चोरण्याच्या संशयावरून एका महिलेला संतप्त नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिला परिसरात संशयास्पदरीत्या फिरत होती. काही नागरिकांना तिच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्यांनी तिला अडवून चौकशी केली. यावेळी नागरिकांनी तिची झडती घेतली असता तिच्या बॅगमध्ये चाकू, गुंगीचे औषध आणि स्प्रे आढळून आला. त्यामुळे संतप्त नागरिकांनी तिला पकडून तत्काळ पिंपरी पोलिसांच्या ताब्यात दिले. या महिलेकडून नेमके कोणत्या उद्देशाने हे साहित्य बाळगण्यात आले होते, ती खरंच बाळ चोरीच्या प्रयत्नात होती का, तसेच तिच्यासोबत आणखी काही साथीदार आहेत का, याचा तपास पिंपरी पोलीस करत आहेत. पोलिसांनी महिलेला ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजही तपासले जात आहेत. दरम्यान, या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड शहरात लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता कोणतीही संशयास्पद व्यक्ती आढळल्यास त्वरित पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पिंपरीतील हॉटेलमध्ये जेवणाच्या ऑर्डरवरून राडा

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरीतील साई चौक परिसरातील एका हॉटेलमध्ये जेवणाच्या ऑर्डरवरून झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर थेट जीवघेण्या हल्ल्यात झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पिंपरी पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल करून तिघांना अटक केली आहे. ही घटना रविवारी (दि.४ मे) रात्री सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास साई चौक येथील हॉटेल रोनक येथे घडली. याप्रकरणी अशिष जगनाथ वाळुंज (वय ३०, रा. नेहरूनगर, पिंपरी) यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तर अब्बास शेख (वय ३०, रा. हॉटेल रोनक समोर, साई चौक पिंपरी), मोहंमद शेख (वय २१, रा. हॉटेल रोनक समोर, साई चौक पिंपरी), पंकज भुमकर (वय ३०, बौद्ध नगर पिंपरी) या तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आशिष वाळुंज आणि त्यांचा मित्र मनोज पुंड हे हॉटेल रोनकमध्ये जेवणासाठी गेले होते. त्यांनी जेवणाची ऑर्डर दिल्यानंतर वेटरने हॉटेल बंद झाल्याचे सांगितले. त्यावरून फिर्यादी आणि वेटर यांच्यात शाब्दिक वाद झाला. या वादातून आरोपी संतप्त झाले आणि त्यांनी फिर्यादींना हॉटेलबाहेर नेऊन मारहाण केली. यावेळी आरोपींनी फिर्यादीच्या डोक्यात झारा मारून गंभीर दुखापत केली. तसेच जीवे मारण्याची धमकी देत रस्त्यावर दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे पोलिसांनी सांगितले. "कोणी मध्ये आले तर त्यालाही सोडणार नाही," अशी धमकी आरोपींनी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या प्रकरणी पिंपरी पोलिसांनी तीन आरोपींविरोधात भारतीय न्याय संहिता कलम १०९, ३५२, ११५(२), ३५(५) तसेच क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# पाणीटंचाईच्या प्रश्नावर नगरसेविका श्रुती वाकडकर आक्रमक

**सर्वसाधारण सभेत प्रशासनाला धरले धारेवर** | **'पवना बंद पाइपलाइन योजना' तातडीने पूर्ण करण्याची मागणी**

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती पाणीटंचाई, कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा आणि अशुद्ध पाण्याच्या समस्येवरून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत नगरसेविका श्रुती राम वाकडकर यांनी प्रशासनाला धारेवर धरले. नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत बंद पडलेली 'पवना बंद पाइपलाइन योजना' तातडीने पूर्ण करण्याची मागणी श्रुती वाकडकर यांनी केली.

सभेत बोलताना श्रुती वाकडकर म्हणाल्या की, प्रभाग क्रमांक २५ मधील वाकड, पुनावळे, ताथवडेसह शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांना अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून काही ठिकाणी अशुद्ध पाणीही मिळत आहे. नियमित कर भरूनही नागरिकांना स्वच्छ व पुरेसे पाणी मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असल्याचे त्यांनी नमूद केले.



पाणीपुरवठ्याच्या समस्येमुळे अनेक गृहनिर्माण सोसायट्यांना दर महिन्याला लाखो रुपये खर्च करून टँकरद्वारे पाणी खरेदी करावे लागत असल्याची बाब त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. त्यामुळे सामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता 'पवना धरण बंद पाइपलाइन योजना' तातडीने कार्यान्वित करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. ही योजना पूर्ण झाल्यास पाणीगळती रोखण्यास मदत होईल तसेच नागरिकांना नियमित, शुद्ध आणि पुरेसा पाणीपुरवठा करता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी त्यांनी प्रशासनाला अनेक थेट प्रश्न विचारले. कर भरूनही नियमित पाणीपुरवठा का होत नाही? कमी दाबाने आणि अशुद्ध पाणीपुरवठा होण्यामागील कारणे काय? नागरिकांना टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ का येत आहे? तसेच 'पवना बंद पाइपलाइन योजना' अद्याप प्रलंबित का आहे, याबाबत त्यांनी स्पष्टीकरण मागितले.

टँकरमुक्त पिंपरी-चिंचवड घडवण्यासाठी आणि नागरिकांना त्यांच्या हक्काचे पाणी मिळवून देण्यासाठी 'पवना बंद पाइपलाइन योजना' तातडीने सुरू करून लवकरात लवकर पूर्ण करावी, अशी ठाम मागणी श्रुती वाकडकर यांनी केली. प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना न केल्यास नागरिकांचा रोष वाढण्याची शक्यता असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

# आधी सुविधा द्या.. मगच कररचनेची विभागणी करा

पिंपरी (दै. संध्या)

मिळकतकर आकारणीसाठी शहरातील मिळकतींची विभागणी तीन ऐवजी दोन विभागात करण्याचा प्रस्ताव पिंपरी चिंचवड महापालिका सर्वसाधारण सभेत मांडण्यात आला होता. त्यावर स्थायी समितीने मान्यताही दिली आहे, यामुळे करवाढ होणार असल्याने नागरिकांवर अतिरिक्त बोजा नको अशी भूमिका घेत भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक राहुल कलाटे यांनी आक्रमक भूमिका घेत विरोध दर्शवला आणि प्रशासनाकडून स्पष्टता मागितली. पिंपरी चिंचवड महापालिकेची सर्वसाधारण सभा आज (दि.५ मे) पार पडली. यावेळी कर दरवाढ विषय चर्चेत आला. कर आकारणीसाठी महापालिका करसंकलन विभागाने शहरातील मिळकतींची विभागणी अ, ब आणि क अशा तीन विभागात केली आहे. समाविष्ट गावातील वाढती बांधकामे आणि गृहनिर्माण सोसायट्यामुळे सर्व मिळकतींची विभागणी अ व ब अशा दोन विभागात करावी, असा प्रस्ताव भाजप सदस्य बाबासाहेब त्रिभुवन व योगिता नागरगोजे यांनी सर्वसाधारण सभेत मांडला. या प्रस्तावाला स्थायी समितीने १६ मार्च रोजी मंजुरी दिली आहे. परंतु, शहरात पाण्यासह विविध नागरी समस्या गंभीर असताना करवाढ कशासाठी? समतोल सुविधांवर ठरत असल्याने अगोदर सुविधा द्या, नंतर कर रचनेची विभागणी करा, अशी आक्रमक मागणी भाजप सदस्य राहुल कलाटे यांनी केली. हाच धागा पकडत भाजपचे विकास डोळस, उत्तम केंदळे, निलेश नेवाळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे विकास साने, शिवसेनेचे राजेंद्र तरस यांनीही करवाढ करू नये, अशी मागणी केली. त्यावर स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी प्रशासनाची बाजू घेत समतोल साधण्यासाठी कर आकारणी पद्धतीची विभागणी अ व ब अशा दोन विभागात केली असल्याचे सांगितले. तर भाजप गटनेते प्रशांत शितोळे यांनी अभ्यासासाठी विषय १५ मेपर्यंत तहकूब करण्याची सूचना मांडली. ती महापौर रवी लांडगे यांनी मान्य करत विषय तहकूब केला.



**राहुल कलाटे यांच्या आक्रमक भूमिकेनंतर विषय तहकूब**

वाकड, ताथवडे, पुनावळे, चिखली, चऱ्होलीसह महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावात नवीन कर विभागणी पद्धतीमुळे नव्याने तयार होणाऱ्या सदनिका आणि व्यावसायिक मालमत्तांवर करवाढ होणार आहे. नागरिकांना अपुऱ्या सुविधा असताना वाढीव कराचा बोजा नको. अशी लोकप्रतिनिधी म्हणून माझी ठाम भूमिका आहे. तसेच मोकळ्या जागा आणि इतर कर रचनेवर प्रशासनाने स्पष्टता द्यावी आणि नवीन करपद्धती अमलात आणताना त्यातील तज्ञ समिती नेमून निर्णय घ्यावा.

**– राहुल तानाजी कलाटे, नगरसेवक, भाजपा**

# विजयाचा आनंद मोठा, पण चिमुकलीचे दुःख त्याहून मोठे

पिंपरी (दै. संध्या)

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने मिळवलेल्या ऐतिहासिक यशाबद्दल संपूर्ण देशात उत्साहाचे वातावरण असतानाच, पिंपरी-चिंचवड शहर भाजपने मात्र आपली सामाजिक संवेदनशीलता जपली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली मिळालेल्या या मोठ्या विजयाचा कोणताही सार्वजनिक जल्लोष, फटाकेबाजी किंवा गुलाल उधळण न करता, मोरवाडी येथील मुख्य कार्यालयात अत्यंत साधेपणाने भारत माता व जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेचे पूजन करून हा विजय साजरा करण्यात आला. पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे एका चिमुकलीवर झालेल्या दुर्दैवी अत्याचाराच्या घटनेमुळे शहर भाजपने हा संवेदनशील निर्णय घेतला. या घटनेचा निषेध व्यक्त करत आणि पीडितेबद्दल सहानुभूती दर्शवत पक्षाने सर्व नियोजित उत्सवी कार्यक्रम रद्द केले. मोरवाडी येथील मध्यवर्ती कार्यालयात पश्चिम बंगालमधील विजयाचे स्वागत केवळ भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी मातेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. शत्रुघ्न बापू काटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास माजी खासदार अमर साबळे, आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सदाशिव खाडे, सरचिटणीस मधुकर बच्चे, वैशाली खाडये यांची प्रमुख उपस्थिती होती.



■ पिंपरी-चिंचवड भाजपने नाकारला जल्लोष

# महापालिकेच्यावतीने मधुकर दामोदर जोशी यांचा मानपत्र देऊन सन्मान

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मानपत्र देऊन माझा सन्मान केला याचा आनंद आहे, परंतु त्याहून अधिक समाधान या महानगरपालिकेच्या सर्वांगीण प्रगतीकडे पाहून मिळत आहे. आजच्या घडीला अनेक महानगरपालिकांमध्ये कार्यातील समर्पकपणा आणि एकसंधता दिसून येत नाही मात्र येथे ती स्पष्टपणे जाणवते. सुखद आणि सुरक्षित निवास, सुलभ व परिणामकारक प्रवास व्यवस्था, आणि आपुलकीचा सहवास या अपेक्षा एक नागरिक म्हणून सर्वांच्या आहेत. या सर्व बाबींमध्ये येथे होत असलेली प्रगती निश्चितच आशादायक आहे, असे मधुकर दामोदर जोशी म्हणाले.



पिंपरी चिंचवड शहराच्या नावलौकिकात आपल्या कार्यकर्तुत्वाने भर घालणाऱ्या तसेच कला, क्रीडा, सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तीमत्त्वांचा महापालिका सर्वसाधारण सभेत सन्मान करण्याचे धोरण ठरविण्यात आले होते. या धोरणानुसार आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आज पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत पत्रकारिता, कला, साहित्य अशा विविध क्षेत्रात ठसा उमटवून शहराच्या नावलौकिकात भर घालणारे मधुकर जोशी यांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, नगरसदस्य मधुरा शिंदे, शितल उर्फ विजय शिंदे, सविता आसवानी, मंदार देशपांडे, सुरेश भोईर तसेच उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड आदी उपस्थित होते.

मधुकर जोशी म्हणाले, तब्बल ४८ वर्षांनंतर महानगरपालिकेच्या या वातावरणात पुन्हा येण्याचा योग आला, ही माझ्यासाठी अत्यंत भावनिक आणि अभिमानाची बाब आहे. या ठिकाणचे वैभव आणि प्रसन्नता केवळ भौतिक रचनेपुरती मर्यादित नसून, ती येथे कार्यरत असलेल्या प्रत्येकाच्या मनातील दृढ विश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोनातून प्रकर्षाने जाणवते. आजचे हे बदल आणि प्रगती पाहताना विशेष आनंद होत आहे.

तसेच महापालिका सभेत बोलताना नगरसदस्यांनी सखोल अभ्यास करूनच मते मांडणे अत्यंत आवश्यक आहे.

अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद मांडणीमुळे शहरातील विविध प्रश्न अधिक समजून घेता येतात आणि त्यांचे निराकरण अधिक सुलभ व परिणामकारक पद्धतीने होण्यास मदत होते, असे मार्गदर्शनही त्यांनी यावेळी केले.

दरम्यान, पत्रकारिता, कला, साहित्य अशा विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविलेले मधूकर जोशी हे नगरपालिका असताना नगरसदस्य म्हणून देखील कार्यरत होते.मानपत्राचे वाचन किरण गायकवाड यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चाकणला मतदार नोंदणी अभियानाला नागरिकांकडून प्रचंड प्रतिसाद

चाकण (दैनिक संध्या) : चाकण नगरपरिषदेच्या वतीने शहरात सुरु असलेल्या नवमतदार नोंदणीत आपले नाव नोंद झाले आहे का, याची खात्री करून घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या मतदार नोंदणी अभियानाला नागरिकांकडून व नवमतदारांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. मतदारांचे नाव सन २००२ च्या मतदार यादी मध्ये आहे, त्यांनी त्यांचे डिटेल्स, तर ज्यांचे नाव २००२ च्या यादीमध्ये नाही, अशा नागरिकांनी आपले आई, वडील, आजी, आजोबा यापैकी एकाचे २००२ चे डिटेल्स देऊन नाव नोंदणी करून घेतली. ज्या महिलांचे नाव २००२ च्या यादीमध्ये नाही, त्यांनी आपल्या माहेरचा पुरावा म्हणजेच आई, वडील, आजी, आजोबा यापैकी एकाचे २००२ चे डिटेल्स देऊन खात्री करून घेतली. नगरसेवक साहेबराव कड व मंगेश कांडगे यांनी सांगितले की," सन २००२ ची मतदार यादी ही इसीआयएनईटी ह्या ॲप प्ले स्टोअर वरुन डाऊनलोड करून घेणे गरजेचे आहे. प्ले स्टोअरवर या ॲपमध्ये सन २००२ ची नावे सर्च केल्यावर मिळतात. जो यादी भाग क्रमांक असेल त्याप्रमाणे आपण दिलेल्या बीआयओ व पर्यवेक्षक असेल त्यांच्या मोबाईल नंबरवर संपर्क साधून त्यांना ते पुरावे दाखवून त्याची माहिती करून घेणे अपेक्षित आहे." याप्रसंगी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, सुनील गोरडे, नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, एड.प्रकाश गोरे, जयश्री नायकवाडी, रूपाली कांडगे, आरती परदेशी, पुनम शेवकरी, हर्षद लेंडघर, सागर बनकर, तृप्ती जगनाडे, ॲड. वर्षा शेवकरी, आकाश जाधव, अनिता घोगरे, मंगेश कांडगे, साहेबराव कड, प्रकाश भुजबळ, विजया तोडकर, मंगेश करपे, सुनिता गोरे, किशोर जगनाडे आदी उपस्थित होते.

### स्व. सुरेशभाऊ गोरे महाविद्यालयाचा बारावीचा 85.71 टक्के निकाल

चाकण (दैनिक संध्या) : स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या येथील स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे ज्युनियर कॉलेजचा बारावी परीक्षेचा शेकडा ८५.७१ टक्के निकाल लागला. उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, प्राचार्या प्रमिला गोरे, चाकणच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, प्रिंसिपल माधुरी गोरे आदींनी कौतुक केले. विभागा प्रमाणे निकाल पुढील प्रमाणे - विज्ञान विभाग - ८५.७१ टक्के, प्रथम सिद्धी गोरक्षनाथ कदम, द्वितीय कुणाल भास्कर भिसे, तृतीय पुनम सुनिल नागरगोजे यांचे आले आहेत. वाणिज्य विभाग - ७३.९१ टक्के, प्रथम ऐश्वर्या हनुमंत मोहिते, द्वितीय अंकिता गणेश क्षीरसागर, तृतीय आनंद नीलकंठ गायकवाड यांचे आले. कला विभाग प्रथम चैताली गजभिये यांचे आले आहेत.



### प्रिया बिरादार यांचे उपोषण स्थगित; प्रशासनाचे लेखी आश्वासन

शिरूर (दैनिक संध्या) : शिरूर शहरात १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी सुरू असलेले बेमुदत उपोषण अखेर प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले. शिरूर शहर भाजप महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया बिरादार यांनी शिरूर तहसील कार्यालयासमोर सुरू केलेले उपोषण तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी मागण्या मान्य करत लेखी आश्वासन दिल्यानंतर स्थगित करण्यात आले. या आंदोलनाला विविध राजकीय, सामाजिक आणि महिला संघटनांचा मोठा पाठिंबा मिळाला. यावेळी जनता दलाचे प्रदेशाध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे, क्रांतीवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय पाचंगे, पंचायत समिती सदस्य दिपक पवार, शेतकरी संघटनेचे बाळासाहेब घाडगे, बापुसाहेब शिवले, माजी सरपंच विठ्ठल घावटे, भाजपा महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्षा वर्षा काळे, आदिशक्ती महिला मंडळाच्या शशिकला काळे, आधार छाया फाउंडेशनच्या सुविता बोरुडे, नगरसेवक निलेश पवार, संतोष थेऊरकर, सागर नरवडे, उमेश शेळके, राजेंद्र लोळगे, राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या शहराध्यक्षा श्रुतिका झांबरे, वात्सल्य सिंधू फाउंडेशनच्या उषा वाखारे, सामाजिक कार्यकर्ते निलेश वाळुंज, प्रितेश फुलडाळे, विजय नर्के तसेच सृष्टी करंजुले, सुजाता पाटील, भारती शहाणे, मीरा परदेशी, निलमधु शर्मा, कविता परदेशी, जयश्री हार्दे यांसह नागरिक आणि महिलांची मोठी उपस्थिती होती. शिरूर शहरासाठी उपजिल्हा रुग्णालयाच्या जागेबाबत ११ सप्टेंबर २०२५ पासून सातत्याने पाठपुरावा करूनही तहसील कार्यालयाकडून परिपूर्ण प्रस्ताव पाठवण्यात आलेला नाही.

# पाणपोई सुरू करून भाविक व प्रवाश्यांची तहान भागवली

**जेजुरी (दै. संध्या)**



राज्यात सर्वत्र कडक उन्हाचा तडाखा वाढला असून तापमानवाढीचे परिणाम सर्वसामान्यां दिसून येत आहेत. अशा कडक उन्हाळ्यात राज्याच्या विविध भागांतून कुलदैवत श्री खंडोबा देवाच्या दर्शनासाठी जेजुरीत येणाऱ्या भाविक व प्रवाशांची तहान थंड पाण्याने भागविण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते नवनाथ चौंडकर यांनी बसस्थानकावर पाणपोई सुरू केली आहे.

जेजुरी येथे एसटी बसस्थानक नवीन इमारतीचे काम सुरू असून सध्याच्या रखरखीत उन्हाळ्यात जेजुरीत देवदर्शनासाठी येणारे भाविक व प्रवांश्यांसाठी नवनाथ चौंडकर यांनी स्वतःच्या खर्चातून मोफत थंड व शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली असून, दररोज अनेक भाविक व प्रवासी या सुविधेचा लाभ घेत आहेत.

नवनाथ चौंडकर हे जेजुरी औद्योगिक वसाहतीतील एका खासगी कंपनीत नोकरी करत जोडधंदा सांभाळतात. लहानपणापासून समाजसेवेची आवड असल्याने आपल्या मर्यादित उत्पन्नातूनही गरजूंच्या मदतीसाठी ते सतत पुढाकार घेत असतात. स्थानिक निवडणुकीत पराभव स्वीकारल्यानंतरही त्यांनी लोकसेवेचे व्रत कायम ठेवले आहे.

रुग्णसेवेच्या दृष्टीने त्यांनी आपल्या आईच्या नावाने मोफत रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आहे. जेजुरी महामार्गावर अथवा परिसरात अपघात घडल्यास तातडीची मदत म्हणून ही रुग्णवाहिका तत्परतेने सेवेत असते. याशिवाय विद्यानगर परिसरात शुद्ध पाणीपुरवठ्याचे नियोजन करून नागरिकांना कार्डद्वारे पाणी सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

जेजुरी एसटी बसस्थानकावर बाराही महिने पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावत असते. अशा परिस्थितीत सामाजिक संघटनांनी जतन केलेल्या जुन्या वृक्षाच्या सावलीखाली नवनाथ चौंडकर यांनी थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उभी केली आहे. त्यामुळे दूरवरून येणारे भाविक तसेच पंचक्रोशीतील नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे. यापुढे जेजुरी गडावर जाणाऱ्या मार्गावर , रेल्वे स्थानक परिसरातही थंड पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## पत्नीला जीवे मारण्याची धमकी; मध्यरात्री छापा, तलवार जप्त!

**लोणी काळभोर (दै. संध्या)**

पत्नीला जीवे ठार मारण्याची धमकी देत घरात धारदार तलवार लपवून ठेवल्याच्या गंभीर प्रकरणात लोणी काळभोर (ता. हवेली) पोलिसांनी मध्यरात्री कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले. या कारवाईमुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार याप्रकरणी प्राजक्ता मनीष पाबळे यांना त्यांचे पती मनीष बाबुराव पाबळे (वय ४१, रा. पाषाणकर बाग, लोणी काळभोर) यांनी बंदुकीने ठार मारण्याची धमकी दिल्याची तक्रार केली होती. यासंदर्भातील व्हॉईस रेकॉर्डिंगही पोलिसांकडे दिले होते. या तक्रारीची दखल घेत पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने मंगळवार (५ मे) रोजी पहाटे पावणे दोन वाजण्याच्या सुमारास घरावर छापा टाकला. सुरुवातीला पापंबळे याने झडतीस विरोध व टाळाटाळ केली, परंतु पोलिसांनी कायदेशीर प्रक्रिया समजावून सांगितल्यानंतर घराची सखोल तपासणी करण्यात आली. झडतीदरम्यान घरातील लोखंडी कपाटात लपवून ठेवलेली एक धारदार लोखंडी तलवार पोलिसांच्या हाती लागली.

## विवाहित मुलीचे वडिलांकडून अपहरण, ७ आरोपींना ४ तासांत अटक

**नारायणगाव (दै. संध्या)**

**■ पारगाव कारखाना पोलीस ठाण्याचे सपोनि सचिन कांडगे यांची माहिती**




आंबेगाव तालुक्यातील पारगाव येथे विवाहित मुलीचे तिच्या इच्छेविरुद्ध दुसरे लग्न लावून देण्याच्या उद्देशाने वडिलांनीच साथीदारांसह मुलीचे अपहरण केल्याची धक्कादायक घटना ४ मे २०२६ रोजी उघडकीस आली. पारगाव कारखाना पोलिसांनी अवघ्या चार तासांत तत्पर कारवाई करत वडिलांसह ७ आरोपींना अटक केली असून, विवाहितेची सुटका करून तिला पतीच्या हवाली केल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी दिली. याबाबत पोलिसांनी सांगितले की, दि.०४ मे रोजी रात्री ९:०० वा चे सुमारास सौ. साक्षी विशाल भागवत, रा. पारगाव, लबडेमळा, ता. आंबेगाव, जि. पुणे या विवाहित मुलीला तिच्या सासरच्या व्यक्तींसमवेत असताना मुलीचे वडील व इतर ६ जण यांनी मारहाण करून, शिवीगाळ व दमदाटी करत जबरदस्तीने एस.क्रॉस व स्विफ्ट वाहनांमध्ये टाकून अपहरण केले. सदर आरोपींचा उद्देश फिर्यादीस जबरदस्तीने दुसरे लग्न लावून देणे हा होता. सदर घटनेनंतर पारगाव कारखाना पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने तात्काळ हालचाल केली. घटनेनंतर अवघ्या ४ तासांच्या आत सर्व ७ आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणांहून अटक करण्यात आली.

पारगाव कारखाना पोलीस ठाणे येथे सदर आरोपींचे विरूध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ८७, ११५(२), १८९(२), १९०, १९१(२), ३५२, ३५१(२) (३) कलमांन्वये गुन्हा क्र. ४२/२०२६ नोंद करण्यात आला आहे.

## रिव्हॉल्व्हरच्या धाकावर दरोडा : बारामती तालुका पोलिसांची धडाकेबाज कारवाई, चार आरोपी जेरबंद

### तासगावच्या व्यापाऱ्याला बारामतीत लुटले; पोलिसांनी पाठलाग करून पकडले; अवघ्या काही तासांत आरोपींच्या मुसक्या आवळल्या ८,१५,००० रु चा मुद्देमाल जप्त

**बारामती (दै. संध्या)**



बनावट फेसबुक अकाउंट वरून स्वस्त दरात गहू देण्याच्या आमिषाने व्यापाऱ्याला जाळ्यात ओढून रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवत मारहाण करून रोख रक्कम व दागिने लुटणाऱ्या टोळीला बारामती तालुका पोलिसांनी अवघ्या काही तासांत जेरबंद करत धडाकेबाज कामगिरी केली आहे. सतत बदलणाऱ्या ठिकाणांचा माग काढला आणि पाच स्वतंत्र पोलिस पथकांचा समन्वय यामुळे ही कारवाई शक्य झाली.

रवी संजय माने (वंजारवाडी, बारामती), श्रीकांत अर्जुन घुले (ढेकळवाडी, बारामती), अभिषेक भाऊसो ठोंबरे (ढेकळवाडी, बारामती), अतुल मोहन भोलणकर (वंजारवाडी, बारामती) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. तासगाव (जि. सांगली) येथील सूरज सरजेराव गावडे (वय २७) हे गव्हाच्या पिठाच्या व्यवसायात कार्यरत आहेत. फेसबुक मार्केटप्लेसवर "बाजारभावापेक्षा स्वस्त गहू" अशी जाहिरात पाहून त्यांनी संबंधित लिंकवर आपली माहिती भरली. त्यानंतर त्यांना खोट्या फेसबुक अकाउंट वरून फेसबुक ऑडिओ कॉल वरून संपर्क साधण्यात आला आणि बारामती येथे येण्यास सांगण्यात आले. ४ मे २०२६ रोजी गावडे हे आपल्या छोटा हत्ती टेम्पो व चालकासह बारामती येथे पैसे घेऊन दाखल झाले. फोनवरील सूचनांनुसार त्यांना पेन्सिल चौक, त्यानंतर कल्याणी कॉर्नर येथे बोलावण्यात आले. हा संपूर्ण प्रकार नियोजनबद्ध असल्याचे पुढे स्पष्ट झाले. कल्याणी कॉर्नर येथे एक संशयित इसम स्कूटीवर आला. त्याने "शेठने पाठवले आहे" असे सांगून गावडे व त्यांच्या चालकाला गहू दाखवण्याच्या बहाण्याने सोबत नेले. स्कूटीला नंबर प्लेट नव्हती आणि त्या इसमाने चेहऱ्यावर मास्क लावला होता. यानंतर त्यांना पेंजिओ कंपनीच्या मागील बाजूस, पुलाचे काम सुरू असलेल्या परिसरातील निर्जन प्लॉटमध्ये नेण्यात आले. येथे आधीच चारचाकी वेरना गाडी मध्ये इतर आरोपी थांबलेले होते. निर्जन ठिकाणी पोहोचताच आरोपींनी आपला खरा हेतू उघड केला. एका उंच इसमाने हातात पिस्तूल घेत गावडे यांच्या कपाळावर ठेवली, तर दुसऱ्याने चालकाच्या कपाळावर बंदूक रोखली. दोघांनाही शिवीगाळ करत बेदम मारहाण करण्यात आली. यानंतर आरोपींनी जबरदस्तीने गावडे यांच्या खिशातील २५,५०० रुपये रोख रक्कम काढून घेतली. तसेच त्यांच्या हातातील चांदीच्या दोन अंगठ्या, घड्याळ आणि चालकाच्या कानातील सोन्याची बाळी कटरने काढून घेतली. एकूण सुमारे ५१,५०० रुपयांचा मुद्देमाल लुटण्यात आला. "पोलिसांना सांगितले तर जिवे मारू" अशी धमकी देत आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या नेतृत्वाखाली पोलिस पथक सायंकाळी ५.२५ वाजता तात्काळ रवाना झाले. विशेष म्हणजे, अशा प्रकारे गुन्हे करणारे आरोपींबाबत माहिती पोलिसांनी घेतली. त्या आधारे एक संशयित असल्याबाबतची माहिती पोलिसांच्या हाती लागली होती. फिर्यादीला फोटो दाखविल्यानंतर एका आरोपीची ओळख पटली आणि तपासाला वेग आला. सायबर पोलिसांची मदत घेण्यात आली. सुरुवातीला आरोपी उंडवडी परिसरात असल्याचे दिसून आले. टोल नाक्यावरील सीसीटीव्ही तपासात त्यांची वेरना कार पाटसच्या दिशेने गेल्याचे स्पष्ट झाले. यानंतर आरोपीं वेळोवेळी रस्ते बदलत राहिले. शिरसुफळ, गाडीखेल, पारवडी, खडकी, रावणगाव, कुरकुंभ, भिगवण, निरगुडे, लाकडी, कळस, डाळज, भाडलवाडी अशा विविध ठिकाणी ते फिरत होते. पोलिसांनी या प्रत्येक ठिकाणी समन्वय साधून जाळे आवळले. पोलीस निरीक्षक यादव यांच्याकडून इंदापूर, भिगवण, वालचंदनगर पोलिसांना सतर्क करून रस्त्यावर नाकाबंदी लावण्यात आली. पोलिसांनी आरोपींची गाडी पाहिली; मात्र त्यांनी गाडी न थांबवता पळ काढला. पोलिसांचा पाठलाग सुरू असल्याचे लक्षात येताच आरोपींनी आरोपींनी गाडीचा वेग आणखी वाढविला. त्यानंतरही पोलिसांनी मोठ्या शिताफीने आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

#### थरारक पाठलाग करून अटक

सिन्नरमास कंपनीजवळ समोरून भिगवण पोलिस आणि मागून वालचंदनगर व बारामती पोलिसांनी घेराव घालत पाठलाग तीव्र केला. अखेर रात्री सुमारे ८.५० वाजता तीन आरोपींना गाडीसह ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर चौथा आरोपी अतुल भोलणकर याला त्याच्या घरातून अटक करण्यात आली. या कारवाईदरम्यान आरोपींकडून ७,५०,००० रु चे सोन्या चांदीचे दागिने, घड्याळ, जिवंत काडतूस सह दोन पिस्तूल, ६५,००० रु रोख रक्कम असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

#### बारामती तालुका पोलिसांच्या टीमवर्कची झलक

ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल, अपर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. वालचंदनगर, भिगवण आणि बारामती तालुका पोलिसांसह सायबर सेलच्या अधिकाऱ्यांनी उत्कृष्ट समन्वय साधत आरोपींना पकडले. विविध ठिकाणी नाकाबंदी, पाठलाग आणि माहितीची देवाणघेवाण यामुळे ही कारवाई यशस्वी ठरली. ही धडाकेबाज कारवाईत पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव, API विक्रम पवार, PSI धनश्री भगत, HC भारत खारतोडे, नितीन ढवण, जितेंद्र शिंदे, शशिकांत दळवी, दादा दराडे, सुरेंद्र वाघ, संतोष कांबळे, आफ्रिन शेख, वालचंद नगर पोलीस स्टेशनचे API राजकुमार डूणगे, HC गणेश काटकर, किसान बेलदार, अभिजित कळसकर, विक्रम मोरे, भिगवन पोलीस ठाण्याचे PSI अमित पाटील, HC महेश उगले, अपर पोलीस अधीक्षक कार्यालयातील ASI गोरख पवार आदींचा कारवाई सहभाग होता.

# शहरी संवाद – AIILSG @ शहरी स्थानिक स्वराज्य संस्थासाठी शहरी परिवर्तनाचे मार्ग

**पुणे (दै. संध्या)**



अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था (AIILSG), महाराष्ट्र यांचेकडून शताब्दी वर्षानिमित्त आयोजित "शहरी संवाद" कार्यक्रमांतर्गत "विकसित महाराष्ट्र – २०४७" या विषयावर व्यापक चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात धोरणकर्ते, लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि शहरी विकास क्षेत्रातील तज्ज्ञ एकत्र येऊन शाश्वत व सर्वसमावेशक शहरी विकासासाठी आवश्यक उपाययोजनांवर विचारमंथन करण्यात आले.

या एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मा. मेधा कुलकर्णी, खासदार (राज्यसभा) उपस्थित होत्या. तसेच मा. समीर राजूरकर महापौर छ. संभाजीनगर महानगरपालिका, मा. श्रीचंद तेजवानी महापौर अमरावती महानगरपालिका, मा. रूपाराणी निकम महापौर कोल्हापूर महानगरपालिका, मा. अश्विनी निकम महापौर उल्हासनगर महानगरपालिका, मा. श्रीनाथ भिमाले –अध्यक्ष स्थायी समिती पुणे महानगरपालिका, मा. जयराज पाठक भा.प्र.से. (से. नि.) महासंचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मा. रवी रंजन गुरु – उपमहासंचालक अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचीही उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत व मान्यवरांच्या सत्काराने झाली. त्यानंतर दीपप्रज्वलन करून कार्यशाळेचा शुभारंभ करण्यात आला. मा. मेधाताई कुलकर्णी यांनी निवडून आलेल्या प्रतिनिधींसाठी प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले, जेणेकरून प्रशासनाची कार्यक्षमता वाढेल. त्यांनी नमूद केले की अनेक स्थानिक प्रतिनिधी आपला बहुतेक वेळ मूलभूत नागरी तक्रारी सोडवण्यात घालवतात, त्यामुळे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी त्यांच्याकडे कमी वेळ उरतो. त्यांनी झपाट्याने वाढणाऱ्या शहरीकरणाचा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या वाढत्या वाहतूक कोंडी, प्रदूषण, शहरी पूरस्थिती, कचरा व्यवस्थापनातील अडचणी आणि अतिक्रमणे इ. समस्यांचा आढावा घेतला. त्यांनी सेवा प्रक्रियेचे डिजिटायझेशन, अधिक चांगले शहरी नियोजन, पावसाचे पाणी साठवण (रेनवॉटर हार्वेस्टिंग) आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनावर आधारित उपाययोजना स्वीकारण्याची गरज अधोरेखित केली. त्यांनी कोणत्याही समस्येवर उपाय शोधताना "विन-विन" दोन्ही बाजूंना लाभदायक असे पर्याय शोधले पाहिजेत, ज्यामुळे शाश्वत विकास आणि राहण्यायोग्य शहरे निर्माण होतील. तसेच, 2047 च्या दृष्टीकोनाशी सुसंगत दीर्घकालीन आणि नागरिहित-केंद्रित विकासावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन उपस्थित सर्व सहभागीयांना केले.

मा. जयराज पाठक भा.प्र.से. (से. नि.) महासंचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांनी संस्थेच्या शंभर वर्षांच्या कार्याचा आढावा घेत, भारतातील शहरी प्रशासन बळकट करण्यासाठी संस्थेचे योगदान आहे असे नमूद केले. "विकसित महाराष्ट्र – २०४७" हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शासन, स्थानिक संस्था व नागरिक यांच्यात समन्वय आणि सहकार्य अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रमुख पाहुण्या मा. मेधा कुलकर्णी, खासदार (राज्यसभा) याच्या हस्ते संस्थेच्या शंभर वर्षाचा आढावा असलेले "शताब्दीची वाटचाल" या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले, सदर पुस्तिकेत संस्थेच्या कार्याचा इतिहास व योगदान याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली आहे. तसेच सदर प्रसंगी लोकसहभाग आधारित हस्तक्षेपाद्वारे –शहरी कचरा व्यवस्थापन आणि परिपत्रक अर्थव्यवस्थेला गती देणे आणि फिकल स्लज आणि सेप्टेज व्यवस्थापनामध्ये शहरी-ग्रामीण अभिसरण या दोन श्वेतपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.

सदर कार्यशाळेत उपस्थित मा. महापौर, मा. नगराध्यक्ष यांना सम्मानित करण्यात आले. या कार्यशाळेत तीन चर्चासत्रे आयोजित करण्यात आली.

सत्र १: विकसित महाराष्ट्र २०४७ साठी शहरी आव्हाने आणि सेवा वितरणातील त्रुटी

सत्र २: विकसित महाराष्ट्र २०४७ हवामान कृतीचे स्थानिकीकरण

सत्र ३: विकसित महाराष्ट्र २०४७ नवकल्पना, डिजिटल प्रशासन व संस्थात्मक सक्षमीकरण

यानंतर मा. चंद्रकांत खोसे सह संचालक नगर पालिका प्रशासन संचलनालय, मा. रवी रंजन गुरु – उपमहासंचालक अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे संबोधन केले. मा. जयराज पाठक भा.प्र.से. (से. नि.) महासंचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांनी तिन्ही सत्रातील प्रमुख मुद्द्यांचा परामर्श घेऊन २०४७ च्या विकसित महाराष्ट्र च्या दिशेने कशी वाटचाल असेल याबाबत संबोधन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्रीमती स्मिता गव्हाणकर यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप मा. जीवन सोनावणे – विभागीय संचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, यांनी आभार प्रदर्शनाने केला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### नसरापूर अत्याचार प्रकरणाचे महापालिका सभेत तीव्र पडसाद

**चिमुकलीला श्रद्धांजली अर्पण करत सभा अर्धा तास तहकूब**

पिंपरी (दैनिक संध्या) : भोर तालुक्यातील नसरापूर येथे ४ वर्षीय चिमुकलीवर झालेल्या अत्याचार आणि हत्येच्या अमानुष घटनेचे तीव्र पडसाद आज पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत उमटले. घटनेचा निषेध नोंदवत आणि पीडित चिमुकलीला श्रद्धांजली अर्पण करून सभागृहाचे कामकाज तब्बल ३० मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले. सभेच्या प्रारंभीच नसरापूर येथील घटनेचा उल्लेख करण्यात आला. त्यानंतर संपूर्ण सभागृहाने उभे राहून मौन पाळत पीडित चिमुकलीला भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण पुणे जिल्हा हादरला असून समाजात संताप आणि हळहळ व्यक्त होत असल्याच्या भावना लोकप्रतिनिधींनी व्यक्त केल्या. श्रद्धांजली प्रस्तावावेळी विविध पक्षांच्या महिला नगरसेविकांनी संतप्त प्रतिक्रिया नोंदवल्या. "अशा नराधमांना समाजात स्थान नाही. आरोपींना कठोरातील कठोर आणि तात्काळ फाशीची शिक्षा झाली पाहिजे," अशी जोरदार मागणी महिला लोकप्रतिनिधींनी केली. काही नगरसेविका बोलताना भावुक झाल्याचे चित्र सभागृहात पाहायला मिळाले. सभागृहात झालेल्या चर्चेदरम्यान महिला आणि बालकांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला. शहर तसेच ग्रामीण भागात वाढत्या अत्याचाराच्या घटनांबाबत चिंता व्यक्त करत प्रशासन आणि पोलिसांनी अधिक कठोर उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी सदस्यांनी केली. या अमानुष घटनेच्या निषेधार्थ आणि पीडितेला श्रद्धांजली म्हणून सभागृहाचे कामकाज अर्ध्या तासासाठी तहकूब करण्याचा निर्णय महापौर रवी लांडगे यांनी घेतला.

### शेड कोसळून एक ठार, दोघे जखमी; भंडारा, गोंदियातही गारपीट

चंद्रपूर (दैनिक संध्या) : जिल्ह्यात मंगळवारी दुपारी अचानक आलेल्या वादळी पावसाने मोठा तडाखा बसला. या वादळामुळे विविध भागांत नुकसान झाले. मूल तालुक्यातील राजोली येथे शेतशिवारातील वीटभट्टीवरील शेड कोसळून प्रशांत डोनू शेणमारे (४२) रा. राजोली यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेत दोन मजूर जखमी झाले असून त्यांच्यावर प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत. विशेष म्हणजे, शेणमारे यांनी नुकतीच वीटभट्टी सुरू केली होती आणि तिची पाहणी करत असतानाच ही दुर्घटना घडली. त्यांच्या पश्चात आई, पत्नी व दोन मुले असा परिवार आहे. जिल्ह्यातील अनेक भागांत मेघगर्जनेसह मुसळधार पावसासह काही ठिकाणी गारपीट झाली. वादळी वाऱ्यामुळे अनेक वीजखांब कोसळले असून वीजपुरवठा खंडित झाला. दरम्यान, डोंगरवार-राजोली मार्गावर झाड कोसळून एका कारचे नुकसान झाले. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली; मात्र काही काळासाठी वाहतूक ठप्प झाली होती. रखरखत्या उन्हाने एकीकडे गोंदिया जिल्हावासीयांना चांगले भाजून काढले असतानाच मंगळवारी सायंकाळी अचानकच वादळी वाऱ्यासह बरसलेल्या अवकाळी पावसाने जिल्ह्याला चांगलेच झोडपून काढले. जिल्ह्यातील बहुतांश भागात हा पाऊस बरसला असून, पावसामुळे घर व दुकानांचे छत उडाल्याचे प्रकार घडले. तर पावसामुळे पिकांचेही नुकसान झाले आहे. काही ठिकाणी पावसासोबतच गारपीटही झाली आहे. प्रचंड उकाड्याने त्रस्त झालेल्या विदर्भाच्या बहुतेक जिल्ह्यातील नागरिकांना मंगळवारी काहीसा दिलासा मिळाला. तापमान १ ते २.५ अंशापर्यंत घसरल्याने उष्णतेचा त्रास कमी झाला. हवामान विभागाने ३ ते ५ मे दरम्यान विदर्भातील सर्व जिल्ह्यांत वादळासह पावसाचा अंदाज वर्तवला होता. मात्र दोन दिवस ढगांची उपस्थिती राहूनही उन्हाचे चटके व उकाड्याने छळले आहे. अखेर मंगळवारी सूर्याचा ताप घटला. नागपूरला सकाळपासून ऊन पडले होते, पण दुपारनंतर वातावरण बदलले व आकाशात काळ्या ढगांनी गर्दी केली होती. काही ठिकाणी तुरळक पाऊस झाला. मात्र उन्हाची तीव्रता बऱ्यापैकी कमी झाली. कमाल तापमान २.४ अंशाने खाली घसरत ४०.८ अंशाची नोंद झाली. अनेक दिवसांनंतर तापमान सरासरीपेक्षा १.९ अंशाने खाली आल्याने उष्णतेचा त्रास कमी झाला. सायंकाळचे वातावरणही आल्हाददायक झाले. रात्रीचे तापमान २.४ अंशाने खाली आले. ब्रह्मपुरीला ०.६ मिमी पावसाची नोंद झाली. सोमवारी देशात सर्वाधिक उष्ण असलेल्या ब्रह्मपुरीचे तापमान २ अंशाने घसरून ४२.२ अंशावर आले. इतर जिल्ह्यातही अंशतः घट झाली आहे.

### राज्यात उद्दिष्टाच्या 20.93 टक्केच तूर खरेदी ; एमएसपी दराने खरेदीवर प्रश्नचिन्ह

नागपूर (दैनिक संध्या) : एसएसपी दराने तूर खरेदीची मुदत ३० एप्रिल रोजी संपुष्टात आली. सरकारने ९० दिवसांमध्ये राज्यात एकूण उत्पादनाच्या २७.०२ टक्के, तर उद्दिष्टाच्या २०.९३ टक्के तुरीची एमएसपी दराने खरेदी केली आहे. राज्यातील ३१,७४७ नोंदणीकृत शेतकऱ्यांकडील तुरीचे मोजमाप शिल्लक असताना खरेदी बंद करण्यात आली. सन २०२५-२६ च्या हंगामात राज्यात १२.६१ लाख टन तुरीचे उत्पादन होण्याचा अंदाज केंद्रीय कृषी मंत्रालयाने व्यक्त केला आहे. त्याअनुषंगाने राज्यात ९० दिवसांत ३.३७ लाख टन तूर एमएसपी दराने खरेदी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. तूर खरेदीसाठी नाफेड व एनसीसीएफने एकूण ९८४ खरेदी केंद्रांना मंजुरी देत ८९७ केंद्र सुरू केले. या केंद्रांवर ७३,५५५ शेतकऱ्यांनी तुरी विकण्यासाठी नोंदणी केली आणि त्यातील ७०,६२९ शेतकऱ्यांना पात्र ठरविण्यात आले. या शेतकऱ्यांकडून दोन्ही संस्थांनी ७०,५३१.४२१४ टन तूर खरेदी केली. ही खरेदी उद्दिष्टाच्या २०.९३ टक्के तर एकूण उत्पादनाच्या २७.०२ टक्के आहे. नाफेड व एनसीसीएफने राज्यात २० जानेवारीपासून नोंदणी तसेच १ फेब्रुवारीपासून खरेदीला सुरुवात केली. चालू हंगामासाठी केंद्र सरकारने तुरीची एमएसपी प्रतिक्विंटल आठ हजार रुपये जाहीर केली होती. आयातीमुळे मध्यंतरी चांगल्या प्रतीच्या तुरीचे दर प्रतिक्विंटल ७,००० ते ७,६०० रुपयांपर्यंत खाली आले होते. सरकारने खरेदीला मुद्दाम विलंब केल्याने शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांना बाजारभावाप्रमाणे तुरी विकल्या. यात त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. राज्यात नाफेडकडे ६५,३२७ शेतकऱ्यांनी तुरी विकण्यासाठी नोंदणी केली होती. यातील ६२,५४३ शेतकऱ्यांना नाफेडने पाच ठरविले असून, ३४,०७७ शेतकऱ्यांकडून ६३,९४२.१३३५ टन तूर खरेदी केल्याने त्यांच्याकडील २८,४६६ शेतकऱ्यांकडील तुरीचे मोजमाप शिल्लक आहे. एनसीसीएफकडे ८, २२८ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असली तरी यातील ८,०८६ शेतकरी पात्र ठरविण्यात आले. यातील ४,८०५ शेतकऱ्यांकडील ६,५८९.२८७९ टन तूर खरेदी केली असून, ३,२८१ शिल्लक शेतकऱ्यांना त्यांच्याकडील तुरी एमएसपीपेक्षा कमी दराने खुल्या बाजारात विकाव्या लागल्या.

### वेदनांशी मैत्री करणारे कवी माधव पवार यांचे निधन, सोलापूरात अंत्यसंस्कार

नागपूर (दैनिक संध्या) : प्रेतास घालूनी वस्त्रे, हे सत्य झाकले कोणी...त्या अग्निमध्ये वितळे, देहाचे फसवे लोणी...मृत्यूचं वास्तव अशा पंक्तीमधून व्यक्त करणारे अन् शारिरिक वेदनांशी दोस्ती करून मृत्यूला एक उत्सव मानणारे मराठीतील ज्येष्ठ कवी माधव पवार (७१, रा. निर्मिती टॉवर्स, मोदीखाना ) यांचे बुधवारी पहाटे चार वाजता येथील निवासस्थानी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सूना, नातवंडे असा परिवार आहे. सायंकाळी मोदी स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून २७९२ रुग्णांना मदत

## २३.५१ कोटी रूपयांचा निधी वितरीत

**मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत नाशिक जिल्ह्यात २,७९२ रुग्णांना ₹२३.५१ कोटींची मदत देण्यात आली आहे. गंभीर आजारांनी ग्रस्त व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी ही योजना जीवनदायी ठरत असून जिल्ह्यात तिची अंमलबजावणी परिणामकारकरीत्या करण्यात येत आहे.**




## मुख्यमंत्री सहाय्यता निधी जिल्हा कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी ही योजना अशा रुग्णांसाठी कार्यरत आहे ज्यांना प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, माहात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना तसेच राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रम या योजनांचा लाभ मिळू शकत नाही किंवा धर्मादाय रुग्णालयातून मोफत अथवा सवलतीच्या दरात उपचार उपलब्ध होत नाहीत. अशा परिस्थितीत राज्यातील नोंदणीकृत रुग्णालयात उपचार घेत असलेल्या पात्र रुग्णांना वैद्यकीय समितीमार्फत पडताळणी करून आर्थिक सहाय्य दिले जाते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली अर्ज प्रक्रिया सुलभ करण्यात आली असून, रुग्णालयातूनच ऑनलाइन पोर्टलद्वारे अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

योजनेअंतर्गत लाभ मिळविण्यासाठी रुग्णाने तहसील कार्यालयाचा चालू वर्षाचा उत्पन्न दाखला (रूपये१.६० लाखांपेक्षा कमी), रेशनकार्ड, आधारकार्ड, आवश्यकतेनुसार नवजात बालकासाठी आईचे आधारकार्ड, अपघात प्रकरणात FIR/जनरल डायरी नोंद, रुग्ण संमतीपत्र तसेच अवयव प्रत्यारोपणासाठी शासकीय मान्यता सादर करणे आवश्यक आहे. मदत रुग्ण दाखल असतानाच दिली जाते, उपचारानंतर प्रतिपूर्ती दिली जात नाही. कॉक्लिअर इम्प्लांट, अवयव प्रत्यारोपण, कर्करोग उपचार, नवजात व बालकांचे आजार, हृदयरोग, मेंदूचे विकार, डायलेसिस, अपघात व जळीत रुग्ण अशा विविध गंभीर आजारांवर या निधीतून सहाय्य दिले जाते.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी नाशिक जिल्हा कक्षातर्फे राबविण्यात आलेले विशेष उपक्रम 'मुख्यमंत्री सामुदायिक आरोग्य शिबिर सप्ताह' अंतर्गत मे २०२५ मध्ये नाशिक महानगरपालिका क्षेत्रात ४३ ठिकाणी शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमधून २५ हजार ७५८ रुग्णांची प्राथमिक आरोग्य तपासणी करण्यात आली असून ३ हजार ६६ रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भ सेवा देण्यात आली आहे. आषाढी वारी निमित्त त्र्यंबकेश्वर परिसरात "चरणसेवा" उपक्रम राबविण्यात आला. ६५८ स्वयंसेवकांच्या माध्यमातून ४ हजार २३६ वारकऱ्यांना आरोग्य सेवा देण्यात आली, वारकऱ्यांना त्यांच्या विसाव्याच्या ठिकाणी स्थानिक लोकप्रतिनिधी, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ सलग्न आयुर्वेद मेडिकल कॉलेज व फिजिओथेरपी कॉलेज यांच्या समन्वयातून वारकऱ्यांना हा चरणसेवा लाभ देण्यात आला.

जुलै महिन्यात अपघातग्रस्त गरजू तरुणीस तात्काळ आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले. तसेच दुर्गम भागातील आदिवासी कुटुंबातील बालकाची सुमारे साडेतीन लाख रुपये खर्चाची हृदय शस्त्रक्रिया पूर्णतः मोफत करण्यात आली आहे. मुख्यमंत्री श्री फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये अवयव दान प्रचार व प्रसार कार्य जिल्हा कक्षामार्फत राबविण्यात आले.

ऑगस्ट महिन्यात सोग्रसफाटा येथील अपघातात जखमी झालेल्या ११ विद्यार्थ्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून एकूण रूपये ८.९६ लाखांची मदत देण्यात आली, ज्यामुळे त्यांच्यावर तातडीने उपचार होऊ शकले. "श्री गणेशा आरोग्याचा" या उपक्रमांतर्गत १ हजार ९८ ठिकाणी आरोग्य शिबिरे घेऊन ४५ हजार ८७२ नागरिकांची मोफत तपासणी करण्यात आली. सार्वजनिक सहभागातून आरोग्य जनजागृतीला चालना मिळाली. सप्टेंबर महिन्यात केवळ ६९० ग्रॅम वजनाच्या नवजात शिशूस मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून उपचारासाठी मदत मिळून नवजीवन प्राप्त झाले. तसेच नेत्र तपासणी अभियानांतर्गत ४ हजार १०५ शिबिरांमधून ५६ हजार ८८१ लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली. सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस महाराष्ट्रात नैसर्गिक आपत्ती मध्ये पूरग्रस्त शेतकरी व नागरीक यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रूग्णालय मदत कक्षाने केलेल्या आवाहनास जिल्ह्यातून एक हात मदतीचा ऑनलाईन पोर्टलद्वारे मदत पोहोचविण्यासाठी उत्तम नियोजन करण्यात आल्याची माहिती नाशिक जिल्हा मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाकडून देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी योजना नाशिक जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असून, गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळवून देण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या नागरिकांसाठी ही योजना दिलासा देणारी ठरत असून लोकाभिमुख व संवेदनशील प्रशासनाचे हे प्रभावी उदाहरण आहे.



# मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग 'मिसिंग लिंक'

## विकासाला वेग देणारा आधुनिक महामार्ग

मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग हा महाराष्ट्राच्या प्रगतीचा कणा मानला जातो. राज्यातील औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक घडामोडींना गती देणारा हा मार्ग आता 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे नव्या उंचीवर पोहोचत आहे. केवळ वाहतूक सुलभ करण्यापुरता मर्यादित न राहता, हा प्रकल्प राज्याच्या व्यापक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. राज्यातील सर्वाधिक वर्दळीचा हा महामार्ग दररोज हजारो वाहनांची वाहतूक सांभाळतो. मात्र, बोरघाट परिसरातील तीव्र वळणे, चढ-उतार, पावसाळ्यातील दरडी कोसळण्याचे प्रकार आणि त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी ही वर्षानुवर्षे मोठी समस्या राहिली. या अडचणींवर कायमस्वरूपी उपाय म्हणून 'मिसिंग लिंक' प्रकल्पाची संकल्पना पुढे आली आणि २९ ऑगस्ट २०१८ रोजी या महत्त्वाकांक्षी योजनेला शासनाची मंजुरी मिळाली. सुमारे ६६९५ कोटी रुपयांचा हा प्रकल्प भौतिकदृष्ट्या पूर्ण झाला आहे.

अडोशी बोगदा ते खंडाळा एक्झिट हा मार्ग सध्या सहा पदरी असला तरी येथे दहा पदरी वाहतूक एकत्र येते. घाटातील अवघड भौगोलिक परिस्थितीमुळे अनेकदा वाहतुकीचा वेग मंदावतो. विशेषतः पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका वाढतो आणि काही लेन बंद कराव्या लागतात. यामुळे वेळेचा अपव्यय, अपघातांची शक्यता आणि आर्थिक नुकसान वाढते. या पार्श्वभूमीवर 'मिसिंग लिंक' प्रकल्प हा एक पर्यायी, अधिक सुरक्षित आणि सरळ मार्ग म्हणून उभारण्यात आला आहे. या प्रकल्पाअंतर्गत खोपोली ते कुसगाव दरम्यान नवीन सरळ मार्ग तयार करण्यात आला आहे. एकूण १९.८४ कि.मी. लांबीच्या या मार्गात ५.८६ कि.मी. अंतरावर जुन्या रस्त्याचे सहा पदरीवरून आठ पदरीकरण करण्यात आले आहे, तर उर्वरित १३.३ कि.मी. पूर्णपणे नवीन मार्ग आहे. या नव्या मार्गामुळे प्रवासाचे अंतर सुमारे ६ किमीने कमी होणार असून, २० ते ३० मिनिटांचा वेळ वाचणार आहे. यामुळे प्रवाशांचा अनुभव अधिक जलद आणि सुलभ होणार आहे.

मिसिंग लिंकमुळे भारतातील पहिला एक्सप्रेस-वे आता अधिक वेगवान आणि सुरक्षित होत आहे. मिसिंग लिंकसह वेळ आणि इंधन वाचविणारा सुरक्षित आणि वेगवान प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. मिसिंग लिंक जगातील सर्वात रुंद बोगदा (२३.५ मीटर) असून लोणावळा तलावाच्या १८० मीटर खालून खोदलेला बोगदा आहे. या ठिकाणी ६५० मीटर केबल-स्टेड ब्रिजसह भारतातील सर्वात उंच सत्यावरील पूल पायलॉन उंची (१८२मीटर) असून गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वात रुंद बोगदा म्हणून नोंद झालेली आहे.

हा 'मिसिंग लिंक' प्रकल्प मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि प्रवासाचा कालावधी लक्षणीयरित्या घटवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अत्याधुनिक अभियांत्रिकी तंत्रज्ञानाचा वापर करून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेही मोठी सुधारणा होणार आहे. मिसिंग लिंक' प्रकल्प हा आधुनिक अभियांत्रिकीचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. या प्रकल्पात दोन समांतर बोगदे (१.६४ कि.मी. आणि ८.९२ कि.मी.), भव्य व्हायाडक्ट, यांचा समावेश असून, वाहनांचा वेग १२० कि.मी. / तास ठेवण्याची सुविधा या मार्गावर उपलब्ध आहे. सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान

या प्रकल्पात प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. बोगद्यांमध्ये वॉटर मिस्ट अग्निशमन प्रणाली, स्कॅडा आधारित नियंत्रण, एएनपीआर कॅमेरे, व्हाइस इव्हॅक्यूएशन सिस्टिम, आधुनिक वायुवीजन व्यवस्था आणि एसओएस सुविधा बसवण्यात आल्या आहेत. या सर्व प्रणालींमुळे अपघात किंवा आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देणे शक्य होणार आहे. 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे अनेक महत्त्वपूर्ण लाभ अपेक्षित आहेत. प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी कमी होणार असून, घाटातील धोकादायक वळणे टाळल्याने अपघातांचे प्रमाण घटेल. वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवास अधिक सुरळीत होईल. इंधनाच्या वापरात घट होऊन दररोज सुमारे १ कोटी रुपयांची बचत होईल, अशी अपेक्षा आहे. एकूणच, हा प्रकल्प प्रवास अधिक सुरक्षित, जलद आणि किफायतशीर बनवणार आहे.

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत अनेक तांत्रिक आणि नैसर्गिक आव्हानांचा सामना करावा लागला. डोंगराळ भागात बोगदे खोदणे, घनदाट वनक्षेत्रात काम करणे, मुसळधार पावसामुळे होणारे अडथळे, तसेच बोगद्यांमध्ये ऑक्सिजन पुरवठा आणि सुरक्षा व्यवस्थापन ही मोठी आव्हाने होती. याशिवाय कोविड-१९ महामारीमुळे आणि काही तांत्रिक चाचण्यांसाठी परदेशी संस्थांवर अवलंबून राहावे लागले मात्र या सर्व अडचणींवर मात करत प्रकल्प यशयशस्वीरित्या पूर्ण करण्यात आला. मुंबई–पुणे 'मिसिंग लिंक' प्रकल्प हा केवळ एक रस्ता नाही, तर आधुनिक तंत्रज्ञान, नियोजन आणि दृष्टीकोन यांचा संगम आहे. या प्रकल्पामुळे केवळ प्रवास सुलभ होणार नाही, तर राज्याच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासालाही मोठी चालना मिळणार आहे. भविष्यात हा प्रकल्प महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांच्या प्रगतीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. महामार्ग हे कोणत्याही राज्याच्या अर्थव्यवस्थेचे रक्तवाहिनीसारखे असतात. मुंबई आणि पुणे ही दोन प्रमुख आर्थिक केंद्रे जोडणारा हा मार्ग उद्योग, आयटी, उत्पादन क्षेत्र आणि सेवा क्षेत्रासाठी जीवनदायिनी भूमिका बजावतो.

# 'टेक-वारी २.०' च्या माध्यमातून महाराष्ट्राची भविष्यातील गतिमान प्रशासनाकडे वाटचाल

**व्ही. राधा, (भा.प्र.से.) अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग (सेवा)**


**मंत्रालयात येत्या ४ ते ८ मे २०२६ या कालावधीत 'टेक-वारी २.०' अंतर्गत 'महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह' या विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. खासगी क्षेत्र, शासन आणि नागरी समाज यामधील तंत्रज्ञ, धोरणकर्ते, कलाकार, आरोग्य-कल्याण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि विविध विषयांचे तज्ज्ञ या वारीत प्रशिक्षण देण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. या प्रशिक्षणात ६ हजार कर्मचारी प्रत्यक्ष सहभागी होत आहेत. राज्यातील कोणताही शासकीय अधिकारी आणि कर्मचारी या प्रशिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी राज्यभरातील नऊ लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक सत्राचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. शासकीय अधिकारी-कर्मचारी यांची गुणवत्ता, कामातील दर्जा वाढविण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या या प्रशिक्षणाला विशेष महत्व आहे.**

एप्रिल २०२६ मध्ये, २ ते १० एप्रिल दरम्यान आयोजित केलेल्या 'महा-साधना सप्ताह' या राज्यव्यापी प्रशिक्षण मोहिमेअंतर्गत, ८.८ लाखांहून अधिक सरकारी कर्मचाऱ्यांनी 'iGOT कर्मयोगी' प्लॅटफॉर्मवर किमान ४ तासांचे संरचित प्रशिक्षण पूर्ण केले. यामध्ये 'सार्वजनिक प्रशासनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता', 'सायबर सुरक्षेची मूलतत्त्वे', आयआयएम बंगळूरुद्वारे 'सार्वजनिक धोरणाची मूलतत्वे' आणि आयआयएम अहमदाबादद्वारे 'रणनीती व गेम थिअरी' या अभ्यासक्रमांची यादी नियोजनपूर्वक तयार करण्यात आली होती. या ७ दिवसांत, महाराष्ट्राच्या सरकारी कर्मचाऱ्यांनी तब्बल ३५ लाख तासांचे सखोल प्रशिक्षण पूर्ण केले. याची नोंद एका थेट डॅशबोर्डवर रिअल-टाइममध्ये नोंदविण्यात आली आणि क्षमता निर्माण आयोगाद्वारे (सीबीसी) सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली.

वेगाने बदलणाऱ्या डिजिटल जगासाठी शासकीय अधिकारी आणि कर्मचारी वर्गाला कसे तयार करायचे, हे आजचे प्रमुख आव्हान आहे. ते केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही. जगभरात यासाठी विविध उपाय राबवले जात आहेत. सिंगापूर आपल्या 'स्किल्सफ्युचर' मोहिमेद्वारे कौशल्यविकासावर भर देत आहे, तर संयुक्त अरब अमिराती संघीय संस्थांमध्ये मुख्य एआय अधिकाऱ्यांची नियुक्ती करत आहे. एस्टोनिया 'डिजिटल स्टेट अकॅडमी' राबवत आहे. या सर्व प्रयत्नांमागे एकच प्रश्न आहे, वेगाने बदलणाऱ्या डिजिटल जगासाठी मोठ्या सरकारी कर्मचारी वर्गाला कसे तयार करायचे? युनेस्कोने २०२५ मध्ये नमूद केले की, जगातील निम्म्याहून कमी देशांनी त्यांच्या ई-गव्हर्नमेंट धोरणांमध्ये एआयचा समावेश केला आहे. त्यामुळे जग अजूनही या क्षेत्रात मार्ग शोधत आहे आणि महाराष्ट्रही आपल्या परिस्थितीप्रमाणे या दिशेने वाटचाल करत आहे.

शासनातील तंत्रज्ञान आता केवळ बॅक-ऑफिसपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते फ्रंट ऑफिसचा भाग बनले आहे. 'डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण अधिनियम, २०२३' नुसार प्रत्येक विभागाला डेटा विश्वस्त म्हणून जबाबदारी पार पाडावी लागते. डिजिलॉकर, उमंग, आधार आणि इंडिया स्टॅक यांसारख्या प्लॅटफॉर्ममुळे नागरिक-शासन संवादात मोठे परिवर्तन घडले आहे. एआय च्या वापराने तक्रार निवारण, अनुपालन देखरेख आणि सेवा वितरणाच्या पद्धतीत बदल घडत आहे, तर उदयोन्मुख क्वांटम कॉम्प्युटिंग येत्या काही वर्षांत सध्याच्या सायबर सुरक्षा प्रणालींसमोर नवे आव्हान उभे करू शकते. या बदलांची माहिती नसल्यास अधिकारी कामात मागे पडू शकतात. मात्र यात त्यांचा दोष नाही, कारण तंत्रज्ञान खूप वेगाने बदलत आहे. हीच दरी भरून काढण्यासाठी 'टेक-वारी' उपक्रम राबवला जात आहे.

'टेक-वारी २.०'चे वैशिष्ट्य म्हणजे हे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचवणे. या पाच दिवसांच्या कार्यक्रमात मंत्रालयात डिजिटल




गव्हर्नन्स, डीपीडीपी कायदा, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, क्वांटम कॉम्प्युटिंग, जनरेटिव्ह एआयचा प्रत्यक्ष अनुभव, सायबर सुरक्षा, प्रशासनातील नीतिमत्ता तसेच केंद्र सरकारच्या प्लॅटफॉर्म्स या विषयांवर तज्ज्ञांची सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. या कार्यक्रमात 'डिजिटल पेमेंट्स'विषयी 'एनपीसीआय'चे सीईओ, 'क्वांटम कॉम्प्युटिंग'विषयी आयबीएमचे सीटीओ तसेच 'एआय'विषयी 'नॅसकॉम'चे फ्रंटियर टेक्नॉलॉजी संचालक मार्गदर्शन करणार आहेत. यासोबतच संवाद, नेतृत्व आणि प्रशासकीय नीतिमत्ता या विषयांवरही सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. कर्मचारी विकासाला प्राधान्य देणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि स्वतः तंत्रज्ञ असलेले मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात येत असून, तो राज्याच्या प्राधान्यक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे.

'टेक-वारी २.०' मागील संकल्पना केवळ तांत्रिक शिक्षणापुरती मर्यादित नाही. या पाच दिवसांत पाच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 'तालरंग', 'नादरंग', 'योगरंग', 'कलारंग' आणि 'संस्कृतीरंग' असे पाच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तालरंगाद्वारे ढोलकीच्या माध्यमातून संघभावना वृद्धिंगत केली जाते, नादरंगातून संगीताच्या माध्यमातून तणावमुक्तीवर भर दिला जातो, तर योगरंगातून मन आणि शरीराच्या संतुलनावर लक्ष केंद्रित केले जाते. कलारंगामध्ये कला, एआय आणि प्रशासन यांतील संबंधांचा वेध घेतला जातो. तसेच, संस्कृतीरंगाद्वारे महाराष्ट्राच्या वारी परंपरेचे प्रतीकात्मक दर्शन घडवण्यात येते.

केवळ नियमांचे पालन करणारा प्रशिक्षित अधिकारी निर्माण करण्यापेक्षा, मानसिकदृष्ट्या सक्षम, सांस्कृतिकदृष्ट्या दृढ आणि व्यावसायिकदृष्ट्या आत्मविश्वासू असलेला सरकारी अधिकारी नागरिकांची अधिक चांगली सेवा करेल, या विश्वासावर या कार्यक्रमाची रचना आधारलेली आहे. तसेच, प्रगती ही मूल्यांवर आधारित असावी, यावरही या उपक्रमात भर देण्यात आला आहे.

'महा-साधना सप्ताह'दरम्यान नोंदवलेले ३५ लाख तासांचे प्रशिक्षण ही केवळ आकडेवारी नसून, त्यातून भविष्यात अधिक चांगले निर्णय, तक्रारींचे जलद निवारण आणि नागरिकांना अधिक सुलभ सेवा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या दिशेने अजूनही अनेक पावले उचलणे बाकी आहे. इतर राज्ये आणि देश या प्रवासाच्या काही टप्प्यांवर आपल्यापेक्षा पुढे आहेत आणि त्यांच्याकडून शिकण्यासारखे खूप काही आहे.

राज्याची दिशा स्पष्ट असून या उपक्रमाला गती मिळत असून त्यातून बांधिलकी जपली जात आहे. ज्याप्रमाणे वारकरी चालत राहतो, त्याच्या प्रवासासारखीच ही टप्प्याटप्प्याने पुढे जाणारी प्रक्रिया आहे.

राज्याचा कर्मचारी वर्ग वारकऱ्यांप्रमाणेच या शिक्षण प्रवासात सहभागी होत आहे. शेवटी सांगायचं म्हणजे 'टेक-वारी 2.0' हा शेवट नसून प्रशासनाच्या या शिकण्याच्या प्रवासातील पुढचा टप्पा मानला जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मुळा–मुठा प्रदूषणप्रश्नी शिष्टमंडळाची निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : मुळा–मुठा नदीतील वाढते प्रदूषण, जलपर्णीचा फैलाव व मच्छरांचा उद्रेक यामुळे नागरिक व जनावरांना होत असलेल्या त्रासाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी नदीकाठच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांची भेट घेतली. या वेळी हवेलीच्या अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते उपस्थित होत्या. या प्रश्नाच्या निषेधार्थ शिष्टमंडळाने १ मे या राष्ट्रीय दिनी जलपर्णीवर बसून उपोषणास सुरुवात केली होती. त्यानंतर विभागीय आयुक्तांच्या आदेशानुसार तहसीलदार तृप्ती कोलते यांनी उपोषणस्थळी भेट देऊन उपोषण मागे घेण्याची विनंती केली. तसेच जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रश्न सोडविण्याबाबत आश्वासन दिले. यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्यासमवेत शिष्टमंडळाची सविस्तर चर्चा झाली. या वेळी संबंधित प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी लवकरच बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. शिष्टमंडळात हिंगणगावचे माजी सरपंच अंकुश कोतवाल, 'यशवंत'चे संचालक कुंडलिक थोरात, जिल्हा परिषद सदस्य सागर शेलार, नायगावचे माजी सरपंच राजेंद्र चौधरी, बिवरीचे माजी सरपंच वाल्मिक गोते, बोल्हाईमाता देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बळी आबा गावडे, नांदूरचे विशाल नरेंद्र थोरात, कोरेगावमुळचे सोसायटीचे माजी चेअरमन लोकेश कानकाटे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

### कठोर परिश्रम, समर्पण व जिद्द हाच यशप्राप्तीचा मार्ग : प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया

पुणे (दैनिक संध्या) : सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात 'सूर्यदत्त' महाविद्यालयाने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत यशस्वी घोडदौड केली आहे. महाविद्यालयातील एमसीव्हीसी शाखेचा १०० टक्के, विज्ञान शाखेचा ९७ टक्के, वाणिज्य शाखेचा ९० टक्के तर कला शाखेचा ८८ टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेतून तन्मय अनिकेत जहागीरदार (८९.६७ टक्के) प्रथम, इशिता समीर पाटील (८८.१७ टक्के) द्वितीय, तर ऋतुजा प्रताप मगर (८८ टक्के) तृतीय, वाणिज्य शाखेतून वरुण हर्षद जहागीरदार (८९.६७ टक्के) प्रथम, दिलीप सावराम सोळंकी (८५.६७ टक्के) द्वितीय, रिषभ अरविंद चौहान (८४.३३ टक्के) तृतीय, कला शाखेतून गौरी विवेक देशपांडे (८९.८३ टक्के) प्रथम, अमूल्य लक्ष्मण सोनार (८२.६७ टक्के) द्वितीय, निशी संजय मावडीया (८१.६७ टक्के) तृतीय, तर एमसीव्हीसी शाखेतून एलिझाह मेनेजस (६९.६७ टक्के) प्रथम, ओम अमोल शिंदे व जय ऋषिकेश रेळेकर (६७.३३ टक्के) द्वितीय आणि अजय बाळासाहेब नागरे (६४ टक्के) तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. दिव्या प्रकाश भरेकर हिने विज्ञान शाखेत गणित व संख्याशास्त्रात १०० गुण मिळवले आहेत. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया व प्राचार्या डॉ. किरण राव यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व विद्यार्थ्यांसह अथक परिश्रम घेणाऱ्या स्टाफचे आणि पालकांचे कौतुक केले. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "कठोर परिश्रम, समर्पण भाव आणि जिद्द तुम्हाला यशस्वी होण्यात महत्वपूर्ण ठरतात. प्रत्येक विद्यार्थ्याने सातत्यपूर्ण मेहनत घेऊन पालक व शिक्षकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. सूर्यदत्त संस्थेने नेहमीच विद्यार्थ्यांना सर्वोत्तम सुविधा, सर्वांगीण विकासाचे ज्ञान आणि मार्गदर्शन देण्यावर भर दिला आहे. योग्य नियोजन, नियमित मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत याचा परिपाक म्हणजे बारावीच्या परीक्षेतील हे यश आहे. सूर्यदत्त आगामी काळातही विद्यार्थ्यांच्या करिअरला समृद्ध करत त्यांच्या जीवनमानात उन्नती घडवण्यास कटिबद्ध राहील; तसेच प्रतिभेला वाव देत उच्च शैक्षणिक दर्जा कायम राखेल."

### शनिवार आणि रविवार पक्की अनुज्ञप्ती चाचणी; आळंदी रोड येथे स्लॉट उपलब्ध

पुणे (दैनिक संध्या) : प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे कार्यक्षेत्रातील नागरिकांना पक्की अनुज्ञप्ती मिळविण्यासाठी अपॉइंटमेंटचे प्रमाण वाढल्यामुळे वेळेत स्लॉट उपलब्ध होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी शनिवारी व रविवारी सुट्टीच्या दिवशीही पक्की अनुज्ञप्ती चाचणीचे कामकाज सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भात परिवहन आयुक्त कार्यालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, पक्की अनुज्ञप्ती चाचणीसाठीचे स्लॉट शनिवारी आणि रविवारीही उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांनी आवश्यक कार्यवाही केली आहे. उपरोक्त पार्श्वभूमीवर आयडीटीआर, आळंदी रोड कार्यालय येथे शनिवारी आणि रविवारी सुट्टीच्या दिवशी पक्की अनुज्ञप्ती चाचणीचे कामकाज सुरू ठेवण्यात येणार असून नागरिकांना नियमित दिवसांव्यतिरिक्त अतिरिक्त स्लॉट उपलब्ध होणार आहेत. यामुळे अपॉइंटमेंटसाठीची प्रतीक्षा कमी होऊन नागरिकांना वेळेत पक्की अनुज्ञप्ती मिळण्यास मदत होणार आहे. नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीने अपॉइंटमेंट नोंदवून नियोजित वेळेनुसार उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### चाकण औद्योगिक वसाहतीत भाडेकरूंची नोंदणी अपुरी; गुन्हेगारांना आश्रय

चाकण (दैनिक संध्या) : चाकण औद्योगिक वसाहत व परिसरात भाडेकरूंची माहिती खोलीमालक, घरमालक वेळेवर पोलिसांना देत नाही .काही तर देतच नाही त्यामुळे एखादा गुन्हा घडल्यास तो भाडेकरू कोणत्या खोलीत राहतो, तो कुठला आहे ,तो काय करतो याची माहिती खोली मालकालाही नसते आणि पोलिसांनाही मिळत नाही त्यामुळे गुन्हा केल्यानंतर कायदासुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर होत आहे असे भयानक वास्तव आहे. चाकण औद्योगिक वसाहत व परिसरात वाढत्या गुन्हेगारी घटनांमागे भाडेकरूंची अपुरी नोंदणी हा एक महत्त्वाचा घटक ठरत आहे. अनेक ठिकाणी खोलीमालक, घरमालक भाडेकरूंची ओळखपत्रे, मूळ पत्ता,स्थायी पत्ता , नोकरीविषयीची माहिती पोलिसांकडे वेळेवर सादर करत नाहीत. काही खोली मालक भाडेकरूंचा विषय गांभीर्याने घेत नाहीत.अलीकडेच घडलेल्या काही गंभीर गुन्ह्यांमध्ये आरोपी हे भाड्याने राहणारे असल्याचे निष्पन्न झाले आहे. तपासादरम्यान त्यांची कोणतीही अधिकृत नोंद उपलब्ध नसल्याने पोलिसांना शोधकार्य गुन्ह्याचा तपास करताना अनेक अडचणी येत आहेत. त्यामुळे अशा निष्काळजीपणामुळे गुन्हेगारांना वाव मिळत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. पोलिस प्रशासनाने याबाबत कठोर भूमिका घेतली आहे. महाळुंगे पोलिसांनी सात खोलीमालकावर गुन्हे दाखल केले आहेत. सर्व खोलीमालकांना भाडेकरूंची संपूर्ण माहिती नोंदविण्याचे आदेश दिले आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल असा इशाराही देण्यात आला आहे. तसेच नागरिकांनीही संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे असे आवाहन करण्यात आले आहे. चाकण औद्योगिक वसाहतीत व परिसरातील गावात सुरक्षा व्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.प्रशासन, नागरिकांनी एकत्र येऊन यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

# मस्त कलंदर संघाला सातव्या सिंधी प्रीमिअर लीगचे विजेतेपद

## महिलांमध्ये नर्मदा टायटन्स विजयी; सिंधी तरुणांनी सामाजिक भान जपत स्वीकारले अनाथ मुलीचे पालकत्व




पुणे (दै. संध्या)

मस्त कलंदरने जय बाबा स्ट्रायकर्सचा आठ गडी राखून पराभव करत सातव्या सिंधी प्रीमिअर लीगचे विजेतेपद पटकविले. अष्टपैलू कामगिरी करणारा कलंदरचा कर्णधार दीप चंदनानी सामनावीर ठरला. पिंपरीतील मृणाल क्रिकेट मैदानावर २४ दिवस ही स्पर्धा झाली. कसोटी क्रिकेटच्या धर्तीवर दोन डावांचा अंतिम सामना झाला. प्रत्येक डावात ९ षटके खेळण्यात आली.

नाणेफेक जिंकून जय बाबा स्ट्रायकर्सने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, त्यांना चांगली धावसंख्या उभारता आली नाही. पहिल्या डावात ७.३ षटकात अवघ्या २३ धावांत सर्व संघ बाद झाला. मस्त कलंदरने पहिल्या डावात ९ षटकांत ८१ धावा करीत ५८ धावांची आघाडी घेतली. धीरेन सचदेव (३०), कर्णधार दीप चंदनानी (२४) व जय सोमाणी (२१) यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. दुसऱ्या डावात जय बाबा स्ट्रायकर्सने सावध खेळ करत ९ षटकांत ७ बाद ६२ धावा उभारत अवघ्या ४ धावांची आघाडी घेतली. विजयासाठी ५ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात आलेल्या मस्त कलंदरने १.४ षटकांत पाच धावा करीत विजय मिळवला. सिंधी तरुणांना खेळांसाठी प्रोत्साहित करण्याच्या, तसेच सिंधी संस्कृतीचे जतन आणि सामाजिक भावनेतून गेल्या सात वर्षांपासून 'सिंधी प्रीमिअर लीग'चे आयोजन केले जाते. यंदा लीगमधून उभारलेल्या निधीतून साधू वासवानी मिशनमधील अनाथ मुलीचे पालकत्व स्वीकारले आहे, असे नरेश नाशा यांनी सांगितले.

नर्मदा टायटन्स आणि सिंधू स्टारलेट्स यांच्यात झालेल्या अंतिम सामन्यात टायटन्स संघाने बाजी मारत तिसऱ्या महिला सिंधी प्रीमिअर लीगचे विजेतेपद पटकावले. नर्मदा टायटन्सच्या सलामीवीर जिया जोऊकानी (५४) व कर्णधार मुस्कानच्या (२२) धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर निर्धारित ८ षटकांत ४ बाद ९४ धावा केल्या. विजयासाठी ६७ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या सिंधू स्टारलेट्सचा डाव दोन बाद ६७ धावा असा आटोपला. टायटन्सने २७ धावांनी विजय मिळवत करंडक जिंकला.

**संक्षिप्त धावफलक : (पुरुष गट)**

**पहिला डाव :** जय बाबा स्ट्रायकर्स : ७.३ षटकांत सर्वबाद बाद २३ (धीरज दोडवानी १२, धीरेन सचदेव ४-३)
मस्त कलंदर: ९ षटकांत २ बाद ८१ (धीरेन सचदेव ३०, दीप चंदनानी २४, जय सोमाणी २१, वरुण आल्वानी २३-२)
**दुसरा डाव :** जय बाबा स्ट्रायकर्स : ९ षटकांत ७ बाद ६२ (चिंटू २३, धीरज दोडवानी १२, करण श्रॉफ १०, निखिल जावरानी ३-४, दीप चंदनानी १२-२)
मस्त कलंदर : १.४ षटकांत २ बाद ५ (मयूर तिलवानी २, वरुण आल्वानी ३-१, यश रमनानी २-१)
निकाल: मस्त कलंदर ८ विकेट्स राखून विजयी

## नसरापूर अत्याचार प्रकरणात धक्कादायक खुलासा

पुणे (दै. संध्या)

नसरापूर येथील चिमुकलीवर झालेल्या निर्घृण अत्याचार प्रकरणात पोलिसांच्या तपासातून अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. आरोपी भीमराव कांबळे याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, त्याने ज्या गाईच्या गोठ्यात अत्याचार केला, त्याच गोठ्यात तो चार ते सहा दिवस राहत होता. जवळच विटा उचलण्याचे काम मिळाल्याने त्याने आपले कपडे आणि इतर साहित्य त्या गोठ्यात ठेवले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भीमराव कांबळे तीन दिवस त्या ठिकाणी विटा उचलण्याचे काम करत होता. त्याच वेळी ती चिमुकली त्या परिसरात खेळत होती. आरोपीची या चिमुकलीवर अगोदरपासूनच नजर होती. विटा उचलण्याचे काम संपल्यानंतर त्याच दिवशी त्याने चिमुकलीला गोठ्यात नेले. गोठ्यात घेऊन जाण्यापूर्वी त्याने तिला गाठी शेव खाण्यास दिली. त्यानंतर गोठ्यात नेऊन त्याने चिमुकलीवर अत्याचार केल्याचे समोर आले आहे. पोलिसांच्या चौकशीत भीमराव कांबळे याने "मी त्या दिवशी दारूच्या नशेत होतो," असे सांगितले. मात्र, हे विधान स्वतःचा बचाव करण्यासाठी केले जात असल्याचा पोलिसांचा अंदाज आहे. चिमुकली बेपत्ता झाल्याचे समजताच ग्रामस्थ आणि नातेवाईकांनी तिचा शोध सुरू केला. या शोधकार्यात भीमराव कांबळे स्वतःही ग्रामस्थांसोबत सहभागी झाला होता. मात्र, जेव्हा नातेवाईक गोठ्याच्या दिशेने शोध घेण्यासाठी गेले, तेव्हा तो तेथून पसार झाला. ही बाबही तपासात उघडकीस आली आहे. पुणे ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळेला मध्यरात्री घटनास्थळी नेले. चिमुकली नेमकी कोठे खेळत होती, आरोपीने तिला कुठून सोबत नेले आणि गोठ्यात नेमक्या कोणत्या ठिकाणी अत्याचार केला, याची पाहणी आरोपीच्या उपस्थितीत करण्यात आली.

## शहरातील सीसीटीव्ही यंत्रणा सुदृढ करण्याचे महापौरांचे निर्देश



**महापौरांनी पुढील प्रमुख मागण्या केल्या आहेत**

* शहरातील सर्व सीसीटीव्ही यंत्रणांचा आढावा घेऊन त्या तातडीने कार्यान्वित कराव्यात.
* सर्व सुरक्षा कर्मचाऱ्यांची सक्तीने पडताळणी व नोंदणी प्रक्रिया राबवावी.
* पार्श्वभूमी तपासणीशिवाय कोणालाही सुरक्षा कर्मचारी म्हणून नेमणूक देऊ नये.
* नागरिकांमध्ये सुरक्षा विषयक जनजागृती मोहीम राबवावी.

पुणे (दै. संध्या)

पुणे शहरात अलीकडेच नसरापूर व पर्वती परिसरात घडलेल्या लहान बालकांवरील अत्याचार व हत्येसारख्या अत्यंत गंभीर घटनांच्या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या महापौर मा. मंजुषाताई नागपुरे यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तांना पत्र देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

महापौरांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा पूर्णतः कार्यक्षम असणे अत्यावश्यक आहे. सध्या अनेक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे नादुरुस्त असल्याचे आढळून येत असून, त्यांची तात्काळ दुरुस्ती व पुनर्स्थापना करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.

तसेच, शहरातील सोसायट्या, व्यावसायिक आस्थापना व सार्वजनिक ठिकाणी कार्यरत असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांची योग्य ती पोलीस पडताळणी (Verification) व पार्श्वभूमी तपासणी (Background Check) सक्तीने करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. कोणतीही व्यक्ती योग्य पडताळणीशिवाय सुरक्षा कर्मचारी म्हणून कार्यरत राहू नये, यासाठी कठोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात यावेत, असे महापौरांनी स्पष्ट केले आहे.

याचबरोबर, नागरिकांनीही आपल्या परिसरात सतर्क राहणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे महापौरांनी नमूद केले आहे. शेजारी राहणाऱ्या व्यक्तींची माहिती, नवीन भाडेकरूंची नोंद, संशयास्पद हालचाली याबाबत स्थानिक पोलीस ठाण्याशी संपर्क ठेवण्याबाबत जनजागृती मोहीम राबविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे.

पुणेकर नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत, या विषयाकडे पोलीस प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने प्रभावी कार्यवाही करावी, अशी अपेक्षा महापौर मा. मंजुषाताई नागपुरे यांनी व्यक्त केली आहे.

### आदिवासी आश्रमशाळांची पटसंख्या वाढविण्यासाठी उद्या

## शहापूरमध्ये राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन

भिवंडी (दै. संध्या)

राज्यातील शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता वाढविणे आणि त्यातील अडचणींवर मात करण्यासाठी उद्या, ७ मे २०२६ रोजी, ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील अघई येथे एका भव्य एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

आदिवासी विकास मंत्री यांच्या संकल्पनेतून होणारी ही कार्यशाळा 'आत्मा मालिक शैक्षणिक संकुल' येथे पार पडणार असून यावेळी स्वतः आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांच्यासह सचिव दिनेश वाघमारे, आयुक्त लीना बनसोड, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, ठाणे आदिवासी विकास अपर विकास आयुक्त गोपीचंद कदम,आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी दिवाकर काळपांडे यांच्यासह इतरही मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८:३० वाजता नोंदणी आणि चहा-नाष्ट्याने होईल. त्यानंतर, विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता वाढविण्यासाठी प्रकल्प अधिकारी, शहापूर यांनी तयार केलेल्या विशेष प्रचार प्रसिद्धी वाहनाचे उद्घाटन करण्यात येईल. या कार्यशाळेत केवळ नियोजनावरच चर्चा होणार नाही, तर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळविलेल्या आणि परदेशी विद्यापीठात प्रवेश मिळविलेल्या गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा विशेष गौरवही केला जाणार आहे.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे 'Shaping Futures: A journey of tribal development in Palghar' या कॉफी टेबल बुकलेटचे अनावरण आणि शाळा प्रवेशोत्सवासाठीच्या 'जिंगल'चे लोकार्पण. जव्हार प्रकल्प कार्यालयाच्या 'बेंगलोर भेट' या नाविन्यपूर्ण योजनेची माहिती चित्रफीतही यावेळी दाखविण्यात येईल.

दुपारच्या सत्रात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत (NEP) सखोल मार्गदर्शन केले जाणार असून, नाशिक आणि ठाणे विभागाचे वरिष्ठ अधिकारी आश्रमशाळांमधील सोयी-सुविधा, विद्यार्थ्यांचे आरोग्य, सुरक्षितता आणि गुणवत्ता वाढीचा आराखडा सादर करतील. या कार्यशाळेत विविध प्रकल्पांचे मुख्याध्यापक, गृहपाल आणि अधीक्षक यांच्याशी थेट संवाद साधला जाणार असून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता होईल, अशी माहिती आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी दिवाकर काळपांडे यांनी दिली आहे.

## लोणी काळभोरमध्ये गावठी दारू अड्ड्यावर छापा

लोणी काळभोर (दै. संध्या)

कदमवाकवस्ती ग्रामपंचायत हद्दीतील कवडीपाट परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर धंद्यावर पोलिसांनी कारवाई करुन ३५० लिटर रसायनमिश्रित गावठी हातभट्टीची दारू नष्ट केली आहे. याप्रकरणी आई–मुलासह दारू पुरवठा करणारा या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार याप्रकरणी अक्षय बजरंग मुळेकर (वय २४) आणि त्याची आई मंदा मुळेकर (वय ४७) यांचेसह दादा खलसे ( रा. उरुळी कांचन, ता. हवेली) यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार प्रविण दडस यांनी सरकारच्या वतीने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने दत्त पार्क परिसरात छापा टाकला. यामध्ये अक्षय आणि त्याची आई मंदा मुळेकर यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून ३५ लिटर क्षमतेच्या १० प्लास्टिक कॅनमध्ये साठवलेली उग्र वासाची, आरोग्यास अत्यंत घातक अशी गावठी दारू आढळून आली. ही दारू रसायन मिसळून तयार करण्यात येत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले.

# भारतातील पहिल्या 'ईआरपी प्रदर्शना'चे ७ ते ९ मे या कालावधीत पुण्यात आयोजन

## सागर अहिवळे व मिलिंद हडप यांची माहिती; डिजिटल परिवर्तनाला चालना मिळणार



पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीला डिजिटल युगाशी जोडण्याच्या उद्देशाने भारतातील पहिल्या 'ईआरपी' (एंटरप्राईज रिसोर्स प्लॅनिंग) औद्योगिक प्रदर्शनाचे ७ ते ९ मे २०२६ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड येथील ऑटोक्लस्टर एक्झिबिशन सेंटरमध्ये होणारे हे प्रदर्शन सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे, अशी माहिती संयोजक एक्स्पोनॉमिक्स इव्हेंट्स प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक सागर अहिवळे व मिलिंद हडप यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी रवींद्र कांबळे, डॉ. प्रकाश मुंडे उपस्थित होते.

सागर अहिवळे म्हणाले, "देशभरातील १०० हून अधिक ईआरपी कंपन्या, तंत्रज्ञान पुरवठादार आणि स्टार्टअप्स यामध्ये सहभागी होणार आहेत. या प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार महेश लांडगे, 'डिक्की'चे संस्थापक पद्मश्री मिलिंद कांबळे यांच्या हस्ते होणार आहे. सनवन टेक्नॉलॉजीच्या संचालिका श्रद्धा कुलकर्णी, अप्लिका कन्सल्टन्सीचे प्रमुख रॉड अल्बुकर्क, रिंगफिडरचे सीईओ दीपान रामलिंगम, इंद्रायणी इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष महेंद्र फणसे, रोटरी क्लब ऑफ पिंपरी इलाईटचे अध्यक्ष इरफान आवटे, डब्ल्यूटीई इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लिमिटेडचे संचालक प्रसाद कुलकर्णी, फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजचे सीईओ दिलीप बटवाल यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. समारोप सोहळ्यात एक्स्पोच्या यशस्वी आयोजनाचा आढावा घेतला जाईल. उद्योग क्षेत्रातील डिजिटल परिवर्तनाला पुढे नेण्यासाठी आवश्यक दिशा आणि सहकार्याबाबत मार्गदर्शन केले जाईल. हे प्रदर्शन 'डिजिटल भारत, विकसित भारत' संकल्पनेला गती देत महाराष्ट्राला स्मार्ट औद्योगिक राज्य म्हणून अधिक बळकट करेल."

मिलिंद हडप म्हणाले, "हा उपक्रम उद्योग क्षेत्रातील डिजिटल परिवर्तनाला चालना देण्यासाठी आणि 'एआय व ईआरपी: ट्रान्सफॉर्मिंग एंटरप्राईज एट स्केल' या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. महाराष्ट्रातील तसेच देशातील उद्योगांना पारंपरिक कार्यपद्धतीतून बाहेर काढून स्मार्ट, डेटा-आधारित आणि तंत्रज्ञान-सक्षम औद्योगिक इकोसिस्टम मध्ये रूपांतरित करणे, हा या प्रदर्शनामागील मुख्य उद्देश आहे. विशेषतः एमएसएमई आणि एसएमई क्षेत्रातील उद्योगांना ईआरपी आणि एआय यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देऊन त्यांची कार्यक्षमता, पारदर्शकता आणि स्पर्धात्मकता वाढविणे हा या उपक्रमाचा केंद्रबिंदू आहे."

या तीन दिवसांच्या एक्स्पोमध्ये विविध औद्योगिक क्षेत्रांसाठी स्वतंत्र झोन्स तयार करण्यात आले असून, उत्पादन, वित्त, लॉजिस्टिक्स, रिटेल, हेल्थकेअर, कन्स्ट्रक्शन, इन्फ्रास्ट्रक्चर आणि एडटेक या क्षेत्रांतील अत्याधुनिक ईआरपी आणि डिजिटल सोल्युशन्स सादर करण्यात येणार आहेत. उद्योग तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली चर्चासत्र, मार्गदर्शन सत्रे व कार्यशाळा होणार आहेत. उद्योगांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी विविध उद्योगांसाठी विशेष सेशन्स, बीटूबी नेटवर्किंग, मॅचमेकिंग आणि व्यवसाय संधी निर्माण करण्यावर भर दिला जाईल. सुमारे २०,००० पेक्षा अधिक औद्योगिक अभ्यागत या प्रदर्शनाला भेट देण्याची अपेक्षा आहे.